रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १८ ◆ अंक २०२
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ रविवार, ८ फेब्रुवारी २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

आगामी काळात धोरण आधारित विकासावर भर/२
नवी मुंबईत कचऱ्यापासून वीजनिर्मिती प्रकल्प/६
वर्ल्डकपमध्ये नेदरलँड्सने पाकिस्तानला झुंजवले/८

## आरएसएसचे कार्य राष्ट्रहितासाठीच -डॉ. मोहन भागवत



**मुंबई :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघ कोणत्याही व्यक्ती, पक्ष किंवा संघटनेच्या विरोधात कार्य करीत नसून राष्ट्रहितासाठीच आपले कार्य करतो. संघ हे ना अर्धसैनिक संघटन आहे, ना सत्ता किंवा लोकप्रियतेच्या मागे धावणारे. संघाचे कार्य वैशिष्ट्यपूर्ण असून ते समजून घेण्यासाठी देश-विदेशातून लोक येतात, असे प्रतिपादन सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी शनिवारी (दि. ७) मुंबईत केले. आरएसएसच्या शताब्दी वर्षानिमित्त 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यात्रेची १०० वर्षे-नवे क्षितिज' या कार्यक्रमांतर्गत सरसंघचालक डॉ. भागवत यांनी मुंबईत विविध क्षेत्रांतील मान्यवरांशी संवाद साधला. वरळी येथील नेहरू सेंटरच्या सभागृहात झालेल्या या व्याख्यानमालेत आर्थिक, न्यायिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, क्रीडा, कला, चित्रपटसृष्टी, गृहनिर्माण संस्था आदी विविध क्षेत्रांतील सुमारे ८०० मान्यवर सहभागी झाले होते.

# रायगडात सुमारे ७५ टक्के मतदान

## ५०२ उमेदवारांचे भवितव्य ईव्हीएममध्ये बंद; उद्या निकाल

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद आणि जिल्ह्यातील १५ पंचायत समित्यांच्या निवडणुकीसाठी शनिवारी (दि. ७) मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली. जिल्हा परिषदेच्या ५९ जागांसाठी १७३, तर १५ पंचायत समित्यांच्या ११८ जागांसाठी ३२९ अशा एकूण ५०२ उमेदवारांचे राजकीय भवितव्य मतदान यंत्रात बंद झाले आहे. जिल्ह्यात सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत सुमारे ७५ टक्के मतदान झाले. सोमवारी (दि. ९) मतमाजणी होईल, तेव्हा मतदारांनी कुणाच्या बाजून कौल दिलाय हे स्पष्ट होईल.



जिल्ह्यातील दोन हजार ३२३ मतदान केंद्रांवर सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान झाले. सकाळच्या वेळेत मतदारांचा प्रतिसाद कमी होता. नंतर हळूहळू मतदान केंद्राबाहेर मतदारांच्या रांगा दिसू लागल्या. दुपारी १२नंतर मतदानाचा वेग काहीसा मंदावला, परंतु ३ वाजल्यानंतर पुन्हा एकदा मतदानाचा वेग वाढला.

जिल्ह्यात सर्वत्र मतदान प्रक्रिया सुरळीत आणि शांततेत पार पडली असली तरी काही ठिकाणी मतदान यंत्रांमध्ये बिघाड होण्याचे प्रकार समोर आले. अलिबाग तालुक्यातील सहाण येथील मतदान केंद्रावर सकाळी मतदान प्रक्रिया सुरू होण्यापूर्वीच मतदान केंद्रात बिघाड झाला होता. त्यामुळे सकाळपासूनच रांगेत उभे असलेल्या मतदारांचा काही काळ खोळंबा झाला. तांत्रिक दुरूस्ती करणारे पथक दाखल झाल्यानंतर यंत्रात दुरूस्ती होऊन मतदान प्रक्रिया सुरू झाली. महाडच्या सांदोशी येथेही काही काळ मतदान यंत्र बंद पडले होते.

महाड तालुक्यात रोजगार हमीमंत्री भरत गोगावले यांचे पुत्र विकास गोगावले, अलिबागमधून आमदार महेंद्र दळवी यांच्या पत्नी मानसी दळवी, सून आदिती दळवी, माजी आमदार पंडित पाटील यांच्या पत्नी सुश्रूता पाटील, मुलगा सवाई पाटील, माजी राज्यमंत्री मिनाक्षी पाटील यांच्या सून चित्रा पाटील, पेणमधून माजी आमदार रविशेठ पाटील यांचे पुत्र वैकुंठ पाटील, सून शर्मिला पाटील, भाजपचे दक्षिण जिल्हाध्यक्ष खासदार धैर्यशील पाटील यांच्या पत्नी व जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष नीलिमा पाटील, शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख सुरेंद्र म्हात्रे सहसंपर्क प्रमुख सुरेंद्र म्हात्रे, काँग्रेसचे माजी आमदार मधुकर ठाकूर यांचे चिरंजीव व पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष राजेंद्र ठाकूर, जिल्हा परिषदेचे माजी समाजकल्याण सभापती दिलीप भोईर, भाजपच्या महिला मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष अ‍ॅड. मनस्वी मोहिते निवडणुकीच्या रिंगणात आहेत. यांच्या मतदारसंघाच्या निकालावर सर्वांचे लक्ष असेल.



## मुंबईच्या महापौरपदासाठी भाजपकडून रितू तावडे यांचा उमेदवारी अर्ज दाखल

**मुंबई : प्रतिनिधी**

तब्बल चार वर्षांनंतर मुंबई महानगरपालिकेची निवडणूक पार पडल्यानंतर आता ११ फेब्रुवारी रोजी महापौर ठरणार आहे. यासाठी भाजपकडून रितू तावडे यांनी अर्ज दाखल केला, तर उपमहापौरपदाकरिता शिंदे गटाचे नगरसेवक संजय घाडी यांनी अर्ज भरला. येत्या बुधवारी (दि. ११) महापौर आणि उपमहापौरपदाची निवडणूक आहे.

मुंबई महापालिका मुख्यालयातील सचिव विभागात शनिवारी (दि. ७) सकाळी महापौर आणि उपमहापौरपदासाठी अर्ज भरण्यात आले. मुंबईचे महापौरपद सर्वसामान्य महिलांसाठी राखीव झाले आहे. महापौरपदासाठी भाजपकडून रितू तावडे यांच्या नावाची पक्षाचे मुंबई अध्यक्ष अमित साटम यांनी घोषणा केली. तावडे या घाटकोपरमधील नगरसेविका असून त्यांनी मनपाच्या शिक्षण समितीचे अध्यक्षपदही भूषवले आहे.

पिठासीन अधिकाऱ्यांनी महापौरपदासाठी असलेल्या उमेदवारांची नावे पुकारल्यानंतर नगरसेवकांना आपले मत हात वर करून नोंदवावे लागणार आहे. महापौर निवड झाल्यानंतर नवनियुक्त महापौरांच्या अध्यक्षतेखाली उपमहापौरपदाची निवडणूक प्रक्रिया होईल.

दरम्यान, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने महापौर, उपमहापौरपदाच्या निवडणुकीत उमेदवार न देण्याचा निर्णय घेतल्याचे दिसते. त्यामुळे आता महापौर-उपमहापौरांची औपचारिक निवड बाकी आहे.

> *मुंबईच्या महापौरपदी निवड होणार असली तरी मुंबईची सेवक म्हणून काम करणार आहे. मुंबईच्या हितासाठी सर्व नगरसेवक निवडून गेले आहेत. सभागृहाची प्रतिष्ठा ठेवून मुंबईच्या हितासाठी पक्षभेद विसरून निर्मळ आणि प्रामाणिक काम करावे अशी माझी अपेक्षा आहे.*
>
> **-रितू तावडे,**
> महापौरपदाच्या उमेदवार

## वधू, वरांनी बजावला मतदानाचा हक्क



**रायगड** : लोकशाहीप्रती जबाबदारी जपत रायगड जिल्ह्यातील लग्नाचे कर्तव्य असलेल्या वधू, वरांनीही जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत मतदानाचा हक्क बजावला.

पेण तालुक्यातील वडखळ येथील वधू अक्षता रवी मोकल, आंबेघर येथील वर भूषण भालचंद्र बांद्रे, रोहा तालुक्यातील वाशी गावचे मयूर मधुकर लहाने, महाड तालुक्यातील चांढवे खुर्द येथील विशाल उतेकर, कर्जत तालुक्यातील नेरळ पंचायत गणातील रोशन राजेंद्र लोभी, साहिल ललित जैन, ओमकार सुधीर पांचाळ, शेलू पंचायत गणातून रसिका एकनाथ डुकरे व प्रमोद पांडुरंग तरे तसेच अंथ्रट गावातील संदेश धुळे यांनी 'आधी लगीन लोकशाहीचे' असे म्हणत लग्नाच्या धामधूमीत आवर्जून वेळ काढून मतदान केले. त्याचप्रमाणे इतरांनाही मतदान करण्यासाठी आवाहन केले. त्यामुळे त्यांच्या कृतीचे कौतुक होत आहे.



**पनवेल : रायगड जिल्हा परिषद आणि पनवेल पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, माजी पंचायत समिती सदस्य रत्नप्रभा घरत, माजी उपसरपंच विजय घरत, अ‍ॅड. राहुल घरत, किशोर पाटील यांनी कोपर येथील मतदान केंद्रावर आपला मतदानाचा हक्क बजावला.**

## निवडक

### पंतप्रधान नरेंद्र मोदी मलेशिया दौऱ्यावर

**क्वालालंपूर** : मलेशियाचे पंतप्रधान अन्वर इब्राहिम यांच्या निमंत्रणानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मलेशियाचा दोन दिवसांचा अधिकृत दौरा सुरू केला आहे. पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतल्यापासून पीएम मोदींचा हा तिसरा मलेशिया दौरा आहे. विशेष म्हणजे या दौऱ्यामुळे भारताच्या अ‍ॅक्ट ईस्ट धोरणाला कशी गती मिळते याकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे.

### अनेक भारतीय वस्तूंवर अमेरिकेत झिरो टॅरिफ

**नवी दिल्ली** : नव्या व्यापार करारामुळे भारतातील कृषी उत्पादनांना कोणत्याही अतिरिक्त शुल्काशिवाय अमेरिकेत प्रवेश मिळणार आहे. चहा, मसाले, कॉफी, नारळाचे तेल, वनस्पती, मेण, केळं, अंबा, पेरू, एव्हाकाडो, किवी, पपई, अननस, मशरूम, कंदमुळे, धान्य, बेकरी उत्पादने, कोको उत्पादन, तीळ, खसखस, तुरट रसाची फळे, भाज्या व कृषी उत्पादनावर अमेरिका कोणताही कर लावणार नाही. जेम्स अँड डायमंड, फार्मा, स्मार्टफोन यांचाही झिरो टॅरिफ यादीत समावेश आहे.



## मोहोचा पाडा येथील शेकाप कार्यकर्ते भाजपमध्ये

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सक्षम नेतृत्वाखाली आणि भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून सुरू असलेल्या विकासकामांचा धडाका पाहून इतर पक्षांतील नेत्यांचा ओघ आता भाजपच्या दिशेने वाढू लागला आहे. याच विकासकामांनी प्रभावित होऊन मोहोचा पाडा येथील शेतकरी कामगार पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांनी आणि पदाधिकाऱ्यांनी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला.

या वेळी शेकापचे ज्येष्ठ नेते शंकर भोईर, विभागीय उपाध्यक्ष महेंद्र भोईर, माजी सरपंच रघुनाथ भोईर, संतोष शेळके, साईनाथ भोईर, गणेश भोईर, विठ्ठल भोईर, खंडू भोईर, संतोष भोईर, गणेश भोईर आणि प्रकाश भोईर यांनी शेकापला रामराम ठोकत भाजपचे 'कमळ' हाती घेतले आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांनी सर्वांचे पक्षात स्वागत केले. या पक्षप्रवेशामुळे मोहाचा पाडा परिसरात भाजपची ताकद अधिक मजबूत झाली आहे.

## नवी मुंबईतही बिबट्याचे दर्शन

**नवी मुंबई : बातमीदार**

पनवेल तालुक्यातील खारघर येथील टेकड्यांवर अनेकदा बिबट्या दिसून आल्याच्या चर्चा रंगलेल्या असतानाच आता आधुनिक शहर असलेल्या नवी मुंबईतदेखील बिबट्याचे दर्शन झाले. त्यामुळे नागरिकांमध्ये घबराट पसरली आहे.

सीबीडी सेक्टर ८ येथील ग्रीन व्हॅली पार्क हा निसर्गरम्य परिसर मानला जातो. लहान जंगल म्हणून या भागाला संबोधले जाते. या ठिकाणी गुरुवारी सायंकाळी बिबट्याचे दर्शन झाल्याची माहिती स्थानिक नागरिकांनी दिली. त्याचे व्हिडीओदेखील व्हायरल झाले आहेत. याबाबत वनविभाग सतर्क झाला आहे. नागरिकांनी घाबरून न जाता काळजी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## कोल्हापूरमध्ये भरधाव कारने दुचाकीला चिरडले; दोघांचा मृत्यू

**कोल्हापूर : प्रतिनिधी**



कोल्हापूर शहरातील अत्यंत वर्दळीचा आणि गजबजलेला परिसर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शाहू मिल चौकात शनिवारी (दि. ७) एक भयंकर अपघात घडला. एका भरधाव क्रेटा कारने दुचाकीला दिलेल्या जोरदार धडकेत दोन व्यक्तींचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार ही धडक इतकी भीषण होती की, दुचाकीस्वार हवेत उडून लांब फेकले गेले आणि गंभीर जखमी झाले. क्रेटा कार अत्यंत वेगात होती. या कारने दुचाकीला धडक दिल्यानंतर ती रस्त्याच्या मधोमध उलटली. दुसरीकडे धडक बसलेल्या दुचाकीचा अक्षरशः चक्काचूर झाला आहे. दुचाकीस्वार रस्त्याच्या कडेला असलेल्या मोकळ्या जागेत जाऊन कोसळल्याने त्यांना डोक्याला आणि शरीराला गंभीर दुखापत झाली.

अपघात घडताच स्थानिक नागरिकांनी मदतीसाठी धाव घेतली आणि तातडीने रुग्णवाहिकेला पाचारण करण्यात आले. जखमींना तातडीने उपचारासाठी सीपीआर रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र त्यांचाउपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला, तर अन्य पाच जण जखमी आहेत.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने धाव घेत घटनास्थळी गर्दी केलेल्या बघ्यांना बाजूला केले. पोलिसांनी क्रेनच्या सहाय्याने उलटलेली क्रेटा कार रस्त्यावरून हटवून वाहतूक व्यवस्था पुन्हा सुरळीत केली.

## होळीच्या पार्श्वभूमीवर रेल्वे प्रशासन सज्ज

### विविध मार्गांवर धावणार स्पेशल ट्रेन



**मुंबई : प्रतिनिधी**

होळी जवळ येताच देशभरात रेल्वे प्रवासाची लगबग वाढू लागते. अनेकजण नोकरी-व्यवसायामुळे आपल्या गावापासून दूर राहतात आणि सणासाठी घरी जाण्याचा प्रयत्न करतात. या काळात तिकिटांची मोठी मागणी निर्माण होते आणि नियमित गाड्यांमध्ये प्रचंड गर्दी होते. प्रवाशांना अडचण होऊ नये आणि प्रवास सोपा व्हावा यासाठी भारतीय रेल्वेने मोठी तयारी सुरू केली आहे. यंदा होळी सण लक्षात घेऊन विशेष गाड्या चालवण्याचा निर्णय घेतला असून त्यामुळे प्रवाशांना दिलासा मिळणार आहे.

भारतीय रेल्वेने या वर्षी तब्बल १,४१० होळी विशेष रेल्वेगाड्या चालवण्याचे नियोजन केले आहे. सणाच्या काळात देशभरातून होणारी मोठी प्रवासी हालचाल लक्षात घेऊन ही योजना आखण्यात आली आहे. अतिरिक्त गाड्यांमुळे गर्दी कमी होईल आणि तिकीट मिळण्याची शक्यता वाढेल.

मध्य रेल्वेकडून देशातील विविध मार्गांवर २०९ विशेष गाड्या धावणार आहेत. मुंबई-नागपूर, मुंबई-रत्नागिरी, मुंबई-चिपळूण अशा महत्त्वाच्या मार्गांचा यात समावेश असेल. या गाड्यांमध्ये वातानुकूलित, शयनयान तसेच सामान्य डबे असणार असून काही अनारक्षित सेवादेखील असतील. स्थानकांवर अतिरिक्त तिकीट खिडक्या सुरू करून प्रवाशांची सोय केली जाणार आहे. गाड्यांचे वेळापत्रक आणि थांबे लवकर जाहीर केले जातील.

वाढत्या मागणीचा विचार करून पश्चिम रेल्वेने २३१ सुट्टीकालीन विशेष गाड्या जाहीर केल्या आहेत. या सेवा १ ते २२ मार्चदरम्यान चालतील. उत्तर प्रदेश, बिहार, राजस्थान तसेच उत्तर व पूर्व भारतातील शहरांकडे विशेष लक्ष देण्यात आले आहे, कारण या मार्गांवर होळीच्या काळात मोठ्या प्रमाणात प्रवास होतो.

मोठ्या प्रमाणावर गर्दी अपेक्षित असल्याने प्रमुख स्थानकांवर सुरक्षा वाढवण्यात येणार आहे. मुंबई सेंट्रल, वांद्रे टर्मिनस, उधना, सुरत, अहमदाबाद आदी ठिकाणी विशेष व्यवस्था केली जाईल. प्रतीक्षा क्षेत्रांमध्ये बसण्याची सोय, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, प्रकाश व्यवस्था, पंखे आणि घोषणा प्रणाली उपलब्ध असतील.

## मुंबई-गोवा महामार्गावर झाली वाहतूक कोंडी

**माणगाव : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावर माणगाव परिसरात शनिवारी (दि. ७) मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी झाली. महामार्गावर तब्बल चार ते पाच किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्याने प्रवासी, स्थानिक नागरिक तसेच वाहनचालकांची तारांबळ उडाली.

जिल्हा परिषद आणि पंचायत समिती मतदानाच्या पार्श्वभूमीवर मतदारांना मतदानासाठी जाताना कोणताही अडथळा येऊ नये यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी अवजड वाहनांवर तात्पुरती बंदी घालण्याचे आदेश दिले होते, मात्र प्रत्यक्षात या आदेशांची अंमलबजावणी होत नसल्याचे दिसून आले. बंदी असतानाही अनेक अवजड वाहने महामार्गावरून धावत असल्यामुळेच ही वाहतूक कोंडी झाल्याचे नागरिकांकडून सांगण्यात आले.

प्रवाशांची गैरसोय झाल्याने सकाळपासूनच महामार्गावर वाहतुकीचा वेग मंदावला होता, तर काही ठिकाणी वाहतूक पूर्णपणे ठप्प झाल्याचे चित्र पहायला मिळाले.

## खेळाडूंना पाच टक्के आरक्षणाचा लाभ मिळणार जलदगतीने

### ब्लॉकचेन तंत्रज्ञान वापरण्यास मान्यता

**मुंबई : प्रतिनिधी**

गुणवत्ताधारक शासकीय व निमशासकीय सेवेमधील पाच टक्के आरक्षणाचा लाभ खेळाडूंना पारदर्शक, जलद व त्रुटीमुक्त पद्धतीने मिळावा यासाठी ब्लॉकचेन व कृत्रिम बुद्धिमत्ता या अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करण्यास शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने मान्यता दिली आहे. याबाबतची माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी रश्मी आंबेडकर यांनी दिली.



राज्य व राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांचे आयोजन करणाऱ्या सर्व अधिकृत एकविध क्रीडा संघटनांनी स्पर्धा संपल्यानंतर सात दिवसांच्या आत स्पर्धेचा अंतिम निकाल, सहभागी खेळाडूंची यादी तसेच गुणपत्रिका अभिलेख जतनासाठी संचालनालयाकडे अपलोड करणे बंधनकारक आहे. ही सर्व माहिती संबंधित क्रीडा संघटनेच्या अधिकृत पदाधिकाऱ्यांनी डिजिटल स्वाक्षरीद्वारे प्रमाणित करणे आवश्यक आहे.

निर्धारित कालावधीत माहिती अपलोड न केल्यास संबंधित क्रीडा संघटनांचा डिफॉल्टर यादीत समावेश करण्यात येणार आहे तसेच खेळाडूंनी आपले 'क्रीडा ई-प्रमाणपत्र' क्रीडा विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर अपलोड करणे आवश्यक आहे. दोन्ही बाजूंनी अपलोड करण्यात आलेल्या माहितीची ऑनलाईन पद्धतीने पडताळणी केली जाणार आहे. या नव्या प्रणालीमुळे खेळाडूंना पडताळणीसाठी प्रत्यक्ष विभागीय कार्यालयात येण्याची किंवा कागदपत्रे सादर करण्याची आवश्यकता भासणार नाही. त्यामुळे खेळाडूंना पाच टक्के आरक्षणाचा लाभ अधिक जलद व सुलभपणे मिळणार आहे. यासाठी खेळाडू व संबंधित क्रीडा संघटनांनी क्रीडा विभागास पूर्ण सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी रश्मी आंबेडकर यांनी केले आहे.

# आगामी काळात महाराष्ट्राचा भर धोरण आधारित विकासावर -मुख्यमंत्री

**नागपूर : प्रतिनिधी**

येत्या काळात महाराष्ट्राचा भर धोरण आधारित विकासावर राहणार आहे. यासाठी आम्ही अनेक धोरणे आखली असली, तरी काही धोरणे जुनी झाली असल्याने भविष्यातील गरजा, बदल आणि आव्हाने लक्षात घेऊन येत्या दोन-तीन महिन्यात विविध क्षेत्रांतील भविष्योन्मुख (फ्युचर रेडी पॉलिसी) धोरणे आणली जाणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज (७ फेब्रुवारी) दिली. असोसिएशन फॉर इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंटद्वारे आयोजित अ‍ॅडव्हांटेज विदर्भ-खासदार औद्योगिक महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी इंटरनॅशनल बिझनेस कॉनक्लेव्हचे उद्घाटन झाले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते.



व्यासपीठावर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, ग्लोबल इंडिया बिझनेस फोरमचे जागतिक अध्यक्ष जितेंद्र जोशी, असोसिएशन फॉर इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंटचे अध्यक्ष आशिष काळे यांच्यासह तब्बल २२ देशांचे राजदूत, उच्चायुक्त व बिझनेस प्रतिनिधींची प्रमुख उपस्थिती होती. विशेष म्हणजे याच परिषदेत गुंतवणुकीचे तीन सामंजस्य करारही पार पाडण्यात आले.

याप्रसंगी बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, महाराष्ट्र हे सध्या वेगाने विकसित होणारे राज्य आहे. त्यातल्या त्यात विदर्भाचा प्रदेश झपाट्याने विकसित होत आहे. महाराष्ट्रात सामंजस्य करार केवळ कागदावर होत नसून ते प्रत्यक्षात साकारले जात आहेत. लॉजिस्टिक्स, एआय, सोलर क्षेत्रामध्ये महाराष्ट्र देशात अग्रेसर आहे. सर्वाधिक विदेशी गुंतवणूक महाराष्ट्रात येत आहे. राज्य सरकारने गेल्या काही महिन्यांमध्ये जीसीसी पॉलिसी, जेम्स अँड ज्वेलरी पॉलिसी, बांबू पॉलिसी जाहीर केली आहे. नवे औद्योगिक धोरण आले आहे.

यात भर घालून सात नवीन धोरणांची घोषणा येत्या दोन-तीन महिन्यांत होणार आहे. यामध्ये टेक्सटाइल्स अँड अ‍ॅपरल, लेदर अँड फूटवेअर, इलेक्ट्रॉनिक्स अँड फॅब, एरोस्पेस अँड डीफेन्स, एमएसएमई, फार्मास्युटिकल बायोटेक अँड मेडिकल डीव्हायसेस, सर्क्युलर इकॉनॉमी, बायो प्लास्टिक या क्षेत्रांतील धोरणांचा समावेश असेल. या सातही धोरणांच्या निर्मितीचे काम सुरू असून येत्या तीन महिन्यांत ते जाहीर करण्यात येतील. यामुळे धोरणप्रेरित गुंतवणूक, उद्योगवाढ आणि आर्थिक विकास हेच महाराष्ट्राचं प्रमुख सूत्र ठरेल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

सोलर मॉड्यूलच्या क्षेत्रात नागपूर क्षेत्रात येणारी गुंतवणूक ही देशातील सर्वात मोठी सोलर मॉड्यूल प्रोड्यूसिंग इकोसिस्टीम असून अद्यापही गुंतवणुकीचा ओघ मोठ्या प्रमाणात सुरुच आहे. कृषी प्रक्रियेसह अनेक निर्मितीक्षम क्षेत्रात नागपूर आणि विदर्भाची मोठ्या प्रमाणात आगेकूच सुरु आहे, अनेक क्षेत्रात गुंतवणुकीच्या नव्या संधी येत आहेत. अगदी गडचिरोलीसारख्या क्षेत्रातही मोठ्या प्रमाणात गुंतवणूक आकर्षित होत असून भारताचे स्टील हब म्हणून ते पुढे येत आहे. पुढील दहा वर्षांत गडचिरोलीत पोलादनिर्मितीची सर्वाधिक मोठी क्षमता उभी राहणार आहे. एवढेच नाही, तर गडचिरोलीला पर्यावरणपूरक 'ग्रीन स्टील' हब म्हणून विकसित करण्याच्या दिशेनेही आम्ही ठोस पावले उचलत असल्याचे त्यांनी सांगितले.

अदानी समूहाकडून काल कोल गॅसीफिकेशनच्या क्षेत्रात मोठी गुंतवणुक झाली आहे. देशातील अशा स्वरुपाच्या पहिल्याच गुंतवणुकीमुळे विदर्भातील कोल इकोसिस्टीमचे चित्र संपूर्णपणे बदलणार आहे. ईलेक्ट्रीक व्हेईकल्सच्या क्षेत्रात पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर आणि नागपूरमध्ये सर्वात मोठी गुंतवणूक येत आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

असोसिएशन फॉर इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंटचे अध्यक्ष आशिष काळे यांनी प्रास्ताविकात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या नेतृत्वात विदर्भाचा झपाट्याने विकास होत असल्याचे सांगितले. ग्लोबल इंडिया बिझनेस फोरमने १५० देशांसोबत करार केला असून त्याचा लाभ विदर्भातील एमएसएमईंना स्वत:चा व्यवसाय वाढविण्यासाठी होणार असल्याची माहिती ग्लोबल इंडिया बिझनेस फोरमचे जागतिक अध्यक्ष जितेंद्र जोशी यांनी दिली.

## नवी मुंबई पोलीस भरती ११ फेब्रुवारी ते १४ मार्चला

**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**

सन २०२४-२०२५ मध्ये घोषित करण्यात आलेल्या नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या परिक्षेत्रातील पोलीस शिपाई भरती प्रक्रियेला अखेर महूर्त मिळाला आहे.राज्यातील विधानसभा, पालिका आणि जिल्हा परिषद निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर आचारसंहितेमुळे ही भरती प्रक्रिया रखडली होती. येत्या बुधवार ११ फेब्रुवारीपासून या पोलीस भरतीसाठी मैदानी (५० गुण) चाचणीचे वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे. तर लेखी परीक्षा १०० गुणांची घेतली जाणार आहे. पोलीस शिपाई ४४५ (बॅन्डसमनच्या ६ पदांसह) व चालक पोलीस शिपाई ८२ पदासाठी ही भरती होणार आहे.

नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी काल (ता.६) वार्षिक लेखाजोखा मांडताना नवी मुंबईतील रिक्तपदासाठी भरती प्रक्रिया सुरु होणार असल्याचे स्पष्ट केले होते. पोलीस शिपाई, चालक पोलीस शिपाई आणि बॅन्डसमन या पदाची सन २०२४-२५मध्ये रिक्त पदे भरण्यासाठी भरती प्रक्रिया २९ ऑक्टोबर २०२५ रोजी घोषित करण्यात आली होती. त्यानुसार ७ डिसेंबर २०२५ पर्यंतच्या मुदतीत पोलीस आयुक्तालयाकडे पोलीस शिपाई भरती प्रक्रियेकरिता एकुण ५०,४६० ऑनलाईन अर्ज आले होते. त्यात पोलीस शिपाई १२,२८४ (पुरूष), ३०३१ (महिला), २०९ (माजी सैनिक), तृतीय पंथी १ असे एकुण १५,५२५ उमेदवारांचे तर पोलीस बॅन्डसमनसाठी एकुण ७२० तसेच चालक पोलीस शिपाई पदाकरिता ३४,२१५ अर्ज आले आहेत.

पोलीस शिपाईसाठी मैदानी चाचणी (५० मार्कस) व लेखी परिक्षा (१०० मार्कस) या दोन टप्प्यांमध्ये भरती होणार असून प्रथम मैदानी चाचणी घेण्यात येणार असून त्यात पात्र झालेल्यांची लेखी परीक्षा होणार आहे.चालक पोलीस शिपाई व बॅन्डसमन पदासाठी प्रथम कौशल्य चाचणी नंतर लेखी परीक्षा होणार आहे. पोलीस शिपाई भरती प्रक्रिया निष्कलंक व पारदर्शक पध्दतीने पार पाडण्यासाठी पोलिसांची यंत्रणा सज्ज झाली आहे.

# चर्मकार समाजाच्या सर्व मागण्या तातडीने मार्गी लावू -ना. मंगल प्रभात लोढा

## संत रोहिदास महाराज जयंती महोत्सवाचा शुभारंभ



**मुंबई : प्रतिनिधी**

चर्मकार समाजाच्या सर्व मागण्या वर्षभरात मार्गी लावू असे प्रतिपादन मुख्यमंत्र्यांचे प्रतिनिधी म्हणून मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी केले. रविवारी माघ पोर्णिमेच्या दिवशी संत शिरोमणी रोहिदास महाराज यांच्या ६५०व्या जयंती महोत्सव शुभारंभप्रसंगी ते बोलत होते.

दादर येथील राजा शिवाजी विद्यालयाच्या पटांगणात संपन्न झालेल्या या शुभारंभ सोहळ्यात संत तुकाराम महाराजांचे दहावे वंशज हभप शिवाजीराव मोरे महाराज, स्वामी विज्ञानानंद, मुंबई महानगरसह संघचालक प्रा.डॉ. विष्णूजी वझे आदी मान्यवर उपस्थित होते. या ऐतिहासिक भव्य दिव्य सोहळ्याचे आयोजन महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक विभागाच्या सहकार्याने, चर्मकार समाजाच्या अनेक संघटनांनी मिळून स्थापन झालेल्या संत शिरोमणी रोहिदास महाराज जयंती महोत्सव समितीने केले.

स्व. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मृत्यूच्या दुखवट्यामुळे या कार्यक्रमास अनुपस्थित राहिलेले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिनिधी म्हणून उपस्थित राहिलेले कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नवोपक्रम मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी सांगितले की चर्मकार समाजाच्या मागण्यांचे जे निवेदन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देण्यात आले आहे, त्या सर्व मागण्या येत्या वर्षभरात मार्गी लावण्यात येतील. आपण मंत्री असताना जसे काम केले असते, तसे तत्परतेने या मागण्यांना मार्गी लावू असे उपस्थित चर्मकार समाजाला उद्देशून लोढा म्हणाले. पुढे बोलताना, मुघलांशी संघर्ष करून आपल्या संस्कृतीचे रक्षण करणाऱ्या संत रोहिदास महाराज यांचे आपण सगळे ऋणी आहोत, असेही ते म्हणाले. यावेळी माजी मंत्री भाई गिरकर, माजी आमदार बाबुराव माने हे ही आवर्जून उपस्थित होते. विजय इंगळे, रविंद्र डोईफोडे, देवराम केदार, ज्ञानेश्वर ठोंबरे, रवी पेवेकर, धनंजय वायंगणकर, मयूर देवळेकर, हृदयनाथ खंदारे, गुरुदेव कांबळे, मनोहर खैरे, नवनाथ शिंदे, गोविंद खरटमोल, श्रीमती खंदारे, शुभांगी अहिरे आदी समितीच्या वतीने व्यासपीठावर उपस्थित होते.



**अलिबाग : तालुक्यातील तळवली येथील मतदान केंद्रावर संध्याकाळी ५.१५च्या सुमारास लागलेली रांग.**



**रोहा : राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी दूरटोली (सुतारवाडी) येथे कुटुंबासह मतदान केले. या वेळी मंत्री आदिती तटकरे, माजी आमदार अनिकेत तटकरे, वरदा सुनील तटकरे यांनी मतदानाचा हक्क बजावला. लोकशाही बळकट करण्यासाठी, उज्वल भवितव्यासाठी मतदान करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे, असे खासदार तटकरे यांनी सांगितले.**



**बारामती : उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी काटेवाडी (ता. बारामती) येथे मतदानाचा हक्क बजावला.**

## वरिष्ठ पोलीस निरीक्षक गिरीधर गोरे यांचे निधन

**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबई पोलीस दलातील एक अत्यंत अनुभवी, कर्तव्यदक्ष आणि अभ्यासू अधिकारी म्हणून ओळखले जाणारे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गिरीधर गोरे यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनामुळे पोलीस दलात मोठी पोकळी निर्माण झाली असून सर्व स्तरांतून दुःख व्यक्त केले जात आहे.

गिरीधर गोरे यांनी नवी मुंबई पोलीस दलात अनेक वर्षे सेवा बजावली होती. त्यांच्या कारकिर्दीचा प्रवास थक्क करणारा होता. त्यांनी नवी मुंबईत पोलीस उपनिरीक्षक, सहाय्यक पोलीस निरीक्षक आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशा महत्त्वाच्या पदांवर काम करत शहराच्या सुरक्षेसाठी मोठे योगदान दिले.

सध्या ते नवी मुंबई गुन्हे शाखेत वरिष्ठ पोलीस निरीक्षक म्हणून कार्यरत होते.

## महाडमध्ये पाच वाजेपर्यंत ६७ टक्के मतदान

**महाड : प्रतिनिधी**

मागील चार वर्षांहून अधिक काळ प्रशासकीय राजवट राहिल्यानंतर आज रायगड जिल्हा परिषद व महाड पंचायत समितीसाठी मतदान घेण्यात आले. यासाठी मतदान केंद्रांवर सकाळपासून जितका उत्साह पाहिजे होता तो दिसून आला नाही. तालुक्यातील १ लाख ३९ हजार ४४६ मतदार मतदानाचा हक्क बजावणार होते मात्र ६७ टक्के मतदान झाल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली.



महाड तालुक्यात २०३ मतदान केंद्रांवर सुरळीत मतदान प्रकिया झाली असली तरी फक्त मोहोत याच एका ठिकाणी मतदान यंत्रात बिघाड झाल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली. महाड तालुक्यात दुपारी ३:३० पर्यंत ५६.४२ टक्के मतदान झाल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे. ५:३० पर्यंत ही आकडेवारी साधारण ६० ते ६५ टक्के इतके मतदान होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. वयोवृद्ध नागरिकांनी देखील यावेळी मतदानाचा हक्क बजावला. तर काही गावातील दिव्यांग बांधवांनीदेखील पुढे येत आपला मतदानाचा हक्क बजावला.

निवडणूक निर्णय कार्यालयाकडून २०३ मतदान केंद्रातील बिरवाडी, खरवली, नडगाव तर्फे बिरवाडी, दासगाव, करंजाडी जिल्हा परिषद गटातील मतदान केंद्रांमध्ये ज्या सुविधा देणे आवश्यक होते त्या सुविधा प्रत्यक्षात नसल्याने मतदारांनी नाराजी व्यक्त केली. अनेक ठिकाणी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था देखील नव्हती.

### दिव्यांग आणि वयोवृद्ध मतदारांचे हाल

महाड तालुक्यात अनेक मतदान केंद्रांवर दिव्यांग व्यक्तींना व्हील चेअर सुविधा उपलब्ध करून देण्यात आली नव्हती त्यामुळे कांहीं ठिकाणी दिव्यांग व्यक्तींना दुसऱ्याचा आधार घेतच मतदान केंद्रावर जावे लागत होते. काही मतदान केंद्रांवर जाण्याच्या मार्ग देखील सुरक्षित नसल्याने व्हीलचेअर जाणे देखील कठीण होते. त्यामुळे वयोवृद्ध मतदार आणि दिव्यांग मतदारांचे मात्र चांगलेच हाल झालेले दिसून आले.

## श्रीवर्धन किनाऱ्यावरील धूप प्रतिबंधक बंधाऱ्यावर जेवणाच्या पंगती; किनाऱ्यावर अनधिकृत बांधकाम

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

समुद्रकिनाऱ्यावरती असलेल्या धूप प्रतिबंधक बंधाऱ्यावर सध्या येणाऱ्या पर्यटकांसाठी जेवणाच्या पंगती वाढल्या जात आहेत. समुद्रकिनाऱ्यावरील भागांमध्ये अनधिकृत टपऱ्या व खाद्यपदार्थ बनवणाऱ्यांचे स्टॉल एवढया मोठ्या प्रमाणात वाढत आहेत की, हे स्टॉल धारक जेवणाच्या ऑर्डर घेऊन धूप प्रतिबंधक बंधाऱ्यावरती जेवण वाढत आहेत. मोरया बीच हाउसच्या समोरच्या मोकळ्या जागेमध्ये ज्या ठिकाणी वाहने पार्क होऊ शकतात. अशा जागांवरती जुन्या साड्या बांधून जागा अडवण्याचा प्रकार करण्यात आला आहे. तसेच त्या ठिकाणी लाल माती टाकून जागा अडवून स्टॉल उभी करण्याचा प्रयत्न केला जात आहे.



सध्या श्रीवर्धन नगरपरिषद प्रशासन जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुकीमध्ये व्यस्त आहे. याचाच फायदा अनधिकृत टपऱ्या उभारलेल्यांनी केलेला पाहायला मिळत आहे. श्रीवर्धन मध्ये अनेक हॉटेल व रिसॉर्ट्स आहेत. यापैकी अनेक हॉटेल्स व रिसॉर्ट ही भाडेतत्त्वावरती चालवायला घेतलेली असतात. परंतु श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावरती जर का त्या ठिकाणचे स्टॉल धारक अशा प्रकारे जेवण बनवून धूप प्रतिबंधक बंधाऱ्यावर उघड्यावरती जेवण वाढत असतील तर हजारो रुपये भाडं भरणाऱ्यांनी काय करायचे? नगरपरिषद कार्यालयासमोर हातात कटोरा घेऊन भिक मागो आंदोलन करायचे का? असा प्रश्न हॉटेल मालकांमधून उपस्थित केला जात आहे.

श्रीवर्धन समुद्रकिनारी शासकीय विश्रामगृहाच्या बाजूला असलेल्या स्मशानभूमी व रस्त्यालगत अनेक ठिकाणी जागा अडवून स्टॉल्स उभे करण्यात येत आहेत. अन्न व औषध प्रशासनाने देखील सदर स्टॉल धारकांकडे परवाना आहे का? याची तपासणी करावी व ज्याच्याजवळ खाद्य परवाना नसेल त्याच्यावरती कारवाई करावी. अशी मागणी देखील हॉटेल व्यवसायिकांमधून केली जात आहे. श्रीवर्धन नगर परिषदेवर आता जनतेने निवडून दिलेले नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, नगरसेवक हे लोकप्रतिनिधी बसलेले आहेत. त्यांनी देखील अशा प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष देऊन सदरच्या अनधिकृत स्टॉल धारकांना त्वरित हटविण्याची मागणी हॉटेल मालकांमधून केली जात आहे.

# रिक्षाचालकांविरुद्ध आरटीओकडून कारवाई

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल, खारघर आणि मानसरोवर रेल्वेस्थानक परिसरात रिक्षाचालकांच्या वाढत्या मनमानीविरोधात राज्य शासनाकडे तक्रारींचा पाऊस पडला होता. या तक्रारींची गंभीर दखल घेत पनवेल प्रादेशिक परिवहन कार्यालयाने आता कडक पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. प्रवाशांची लूट आणि उद्धट वर्तणूक रोखण्यासाठी आरटीओने विशेष भरारी पथकांची नियुक्ती केली असून नियम मोडणार्यांवर थेट कारवाईचा बडगा उगारला जाणार आहे.

स्थानक परिसरात रिक्षाचालकांकडून होणाऱ्या त्रासामुळे नागरिक हैराण झाले होते. मुख्यत्वे खालील मुद्द्यांवरून शासनाकडे तक्रारी प्राप्त झाल्या होत्या: गणवेशाचा अभाव: अनेक चालक अधिकृत गणवेश न घालताच रिक्षा चालवतात. मीटरचा वापर टाळणे: मीटरप्रमाणे भाडे घेण्यास नकार देऊन अव्वाच्या सव्वा पैसे उकळले जातात. बनावट मीटर: कारवाई टाळण्यासाठी केवळ दिखाव्यापुरती मीटरची वायर लावली जाते आणि नंतर ती काढून टाकली जाते. उद्धट वर्तणूक: विशेषतः महिला प्रवाशांशी सौजन्याने न वागता दादागिरी केली जाते. प्रवाशांच्या सुविधेसाठी पनवेल आरटीओने चार विशेष पथके तयार केली आहेत. ही पथके पनवेल, खारघर आणि मानसरोवर यांसारख्या गर्दीच्या स्थानकांवर तैनात असतील.

थांब्याव्यतिरिक्त पार्किंग नको : अधिकृत रिक्षा स्टँड सोडून इतरत्र कुठेही रिक्षा उभ्या दिसल्यास तातडीने कारवाई होईल. मीटर अनिवार्य: प्रवाशाने मीटरने जाण्याची मागणी केल्यास चालकाला नकार देता येणार नाही. प्रत्येक संघटनेने आपल्या स्टँडवर 'मीटरने प्रवास' करण्याचे फलक लावणे बंधनकारक आहे. परवाना रद्दची टांगती तलवार: परवाना हा प्रवाशांना त्रास देण्यासाठी किंवा दादागिरी करण्यासाठी दिलेला नाही, असे खडेबोल सुनावत अधिकार्यांनी शिस्त पाळण्याचे आदेश दिले आहेत. सौजन्य राखा: महिला प्रवाशांशी सन्मानाने वागणे आणि कोणताही गैरव्यवहार न करणे ही चालकांची जबाबदारी असेल.

### परमिट रद्द करण्याचा अधिकाऱ्यांकडून इशारा

***प्रवाशांची अडवणूक करणाऱ्या रिक्षाचालकांना आता माफी नाही. आरटीओची पथके साध्या वेशातही लक्ष ठेवणार असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांचे परमिट रद्द करण्यापर्यंतची कारवाई केली जाणार आहे, असे पनवेल प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी सांगितले.***

# द्रोणागिरीत मध्यरात्री बस चोर जेरबंद

## ◆ उरण पोलिसांची धडक कारवाई

**उरण : बातमीदार**

द्रोणागिरी सेक्टर ५० परिसर गुरुवारी मध्यरात्री अक्षरशः हादरून गेला, जेव्हा हातात घातक हत्यार आणि चोरीची बस घेऊन फिरणाऱ्या एका खतरनाक संशयिताचा थरारक पर्दाफाश झाला. स्थानिक नागरिकांच्या सतर्कतेमुळे उरण पोलिसांनी तत्काळ धडक कारवाई करत आरोपीच्या मुसक्या आवळल्या.

मिळालेल्या माहितीनुसार, रात्री साडेदहाच्या सुमारास संशयास्पद हालचाली करत बससह फिरणाऱ्या व्यक्तीकडे रहिवाशांचे लक्ष गेले. परिस्थितीची गंभीरता ओळखत नागरिकांनी धाडसाने त्या संशयिताला घेराव घातला. हत्यार दाखवत पळून जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला नागरिकांनी शिताफीने पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले.

चोरी केलेल्या या मिनी बसवर श्री चिरनेर महागणपती असे नाव आहे तर या बसचा क्रमांक एमएच ०३ सीपी ७८७७ हा बस क्रमांक आहे. दरम्यान, नवी मुंबई परिसरात गेल्या दोन दिवसांत पोलिसांनी तब्बल २६ चोरीची वाहने हस्तगत केली असून, पकडलेला आरोपी हा मोठ्या वाहन चोरी रॅकेटचा भाग असण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. बस नेमकी कुठून चोरीला गेली, याचा सखोल तपास सुरू आहे.

नागरिकांच्या सतर्कतेमुळे मोठा अनर्थ टळला, अशी प्रतिक्रिया उरण पोलिसांकडून देण्यात आली. धाडसी नागरिक आणि तत्पर पोलिसांच्या संयुक्त कारवाईचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# पनवेलमध्ये गृहनिर्माण संस्थांच्या पदाधिकाऱ्यांसाठी भव्य प्रशिक्षण वर्ग

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सहकार भारती पनवेल महानगर जिल्हा आणि रायगड जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, सिडको जिल्हा उपनिबंधक कार्यालय तसेच सहाय्यक निबंधक पनवेल व सिडको यांच्या संयुक्त विद्यमाने पनवेलमध्ये सहकारी गृहनिर्माण संस्थांचे पदाधिकारी आणि सभासदांसाठी एका विशेष प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले आहे.

येत्या शनिवारी, १४ फेब्रुवारी रोजी सकाळी ९.३० वाजता नवीन पनवेल सेक्टर १६मधील श्री रामचंद्र मिशन, प्लॉट नं. २ ओ येथे हा कार्यक्रम होणार आहे. सहकारी गृहनिर्माण संस्थांचे कामकाज अधिक पारदर्शक आणि कार्यक्षम व्हावे या उद्देशाने 'आम्हीच आहोत आमच्या सोसायटीचे शिल्पकार' या महत्त्वपूर्ण संकल्पनेवर आधारित हा प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन सहकार भारती महाराष्ट्र प्रदेशचे महामंत्री आणि महाराष्ट्र राज्य सहकार धोरण उच्चस्तरीय समितीचे सदस्य विवेक जुगादे यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहकार भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष उदय जोशी उपस्थित राहणार असून उपस्थितांना मार्गदर्शन करतील.

या महत्त्वाच्या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून पनवेल विधानसभेचे आमदार प्रशांत ठाकूर आणि विधान परिषदेचे आमदार विक्रांत पाटील उपस्थित राहणार आहेत तसेच सहकार विभागातील वरिष्ठ अधिकारी, ज्यात अलिबागचे जिल्हा उपनिबंधक तनवीर पाटील, सिडकोचे उपनिबंधक प्रताप पाटील, सिडकोचे सहाय्यक निबंधक शंकर पाटील आणि पनवेलच्या सहाय्यक निबंधक भारती काटुळे यांचाही प्रमुख उपस्थितीत समावेश आहे. याव्यतिरिक्त सहकार भारतीच्या गृहनिर्माण प्रकोष्ठ प्रमुख अश्विनी बुलाख, कोकण विभाग प्रमुख राजू ठाणगे आणि कोकण विभाग सहप्रमुख वीणा मोकाशीदेखील उपस्थित राहणार आहेत.

सोसायटीचे दैनंदिन कामकाज आणि सहकार कायद्यातील तरतुदी याबाबत पदाधिकाऱ्यांना आणि सभासदांना सखोल माहिती मिळावी यासाठी या प्रशिक्षण वर्गाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. परिसरातील जास्तीत जास्त गृहनिर्माण संस्थांचे प्रतिनिधी आणि सभासदांनी या उपक्रमास उपस्थित राहून मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहकार भारती पनवेलच्या अध्यक्ष त्रिवेणी सालकर आणि महामंत्री कृष्णा राणे यांनी केले आहे.

# सीकेटी विद्यालयामध्ये मराठी वक्तृत्व स्पर्धा

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या ७५व्या वाढदिवसानिमित्त उपक्रम




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सीकेटी विद्यालयांमध्ये माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या ७५व्या वाढदिवसाच्या निमित्ताने मराठी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले होते. ठीक सकाळी ८:१५ मिनिटांनी कार्यक्रम सुरू होऊन कार्यक्रमाचे प्रास्ताविक चैताली सुर्वे यांनी केले तसेच कार्यक्रमाचे नियम व अटी गायत्री पाटील यांनी केले.

या कार्यक्रमाचे परीक्षक म्हणून प्रा. निलेश अडसुळे आणि प्रा. राजू गायकवाड लाभले. यांची ओळख शशिकला पाटील यांनी करून दिली. या वत्कृत्व स्पर्धेसाठी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेतील सर्व शाळांमधून २४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला असून स्पर्धा उत्तमप्रकारे पार पाडली.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून ॲड. राहुल घरत आणि सुप्रिया ताम्हणकर लाभले होते त्यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिक देण्यात आली. तसेच २८ जानेवारी रोजी बेस्ट टीचिंग प्रॅक्टिस म्हणून जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेतील सर्व शिक्षकांची स्पर्धा घेण्यात आली होती. त्या स्पर्धेमध्ये स्मिता भालेकर यांनी तिसरा क्रमांक पटकावला.

या उपक्रमासाठी समिती प्रकाश पांढरे, रूचिता घोलप तसेच शाळेच्या संगणक शिक्षिका स्नेहल जाधव, नयन, कविता घाडगे यांनी विशेष मेहनत घेतली. विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण, पर्यवेक्षिका नीरजा अदुरी, सर्व शिक्षक यांनी या उपक्रमात सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थी स्पर्धकांचे विशेष कौतुक केले व शुभेच्छा दिल्या.

# उरणमध्ये सरासरी ८० टक्के मतदान

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील नवघर, जासई, चाणजे व चिरनेर जिल्हा परिषदेच्या चार जागांसाठी १४ तर पंचायत समितीच्या नवघर, भेंडखळ, जासई, चिर्ले, चाणजे, केगाव, चिरनेर, आवरे या पंचायत समितीच्या आठ जागांसाठी २३ अशा एकूण १२ जागांसाठी निवडणूकीच्या रिंगणात असलेल्या ३७ उमेदवारांचे भवितव्य काल सायंकाळी मतदान यंत्रात शिलबंद करण्यात आहे. एकंदरीत संपूर्ण उरण तालुक्यातील चारही जिल्हा परिषद गटातील १३५ मतदान केंद्रात

सरासरी ८० टक्के मतदान सायंकाळी ५:३० पर्यंत झाले आहे, तर चाणजे येथे मतदान यंत्र बंद पडल्याचा बाब व किरकोळ प्रकार वगळता अतिशय शांततेत मतदान प्रक्रिया पार पाडण्यात आल्याची माहिती हाती आली आहे.

सकाळपासूनच मतदान केंद्रावर मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावण्यासाठी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदविला. यामध्ये तरुणांसह, महिला, ज्येष्ठ नागरिकांसह वयोवृद्ध आणि दिव्यांनीसुद्धा व्हीलचेअरमुळे मतदान केल्याचे दिसून आले. एकूणच दिवसभरात अतिशय शिस्तबद्धतेने रांगेतच मतदानासाठी मतदान केंद्रावर उभे राहून शासकीय यंत्रणेला सहकार्य करीत मतदानाचा हक्क बजावला.उरण पोलिसांनी कोणताही अनुचित प्रकार होऊ नये यासाठी ५४८ पोलीस अधिकारी, पोलीस अंमलदार, पोलीस शिपाई व होमगार्ड यांचा ताफा तैनात करण्यात आल्याची माहिती उरणचे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा उरणचे तहसीलदार उद्धव कदम यांनी दिली आहे.

# खारकोपर येथील शिव मंदिरात कार्यक्रम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील खारकोपर येथील श्री शिव मंदिर जीर्णोद्धार व प्राणप्रतिष्ठा सोहळा शुक्रवारी आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



या कार्यक्रमांना माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, वायटी देशमुख यांनी भेट देऊन मनोभावे दर्शन घेतले. या वेळी बंटी घरत, केतन ठाकूर, नितेश ठाकूर, रोहन ठाकूर, अभय ठाकूर, जान्हवी ठाकूर, जयश्री पाटील, हरिदास पाटील, वैभव घरत, महेंद्र ठाकूर, ताराचंद ठाकूर, विजय ठाकूर, सुनील ठाकूर, पराग पाटील, हितेश पाटील, निलेशा पाटील आदी उपस्थित होते.

# नितीन पाटील व प्रमिला पाटील यांचे अभिनंदन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या महापौर आणि उपमहापौर पदाच्या निवडणुकीसाठी भाजप महायुतीच्या वतीने महापौर पदासाठी नितीन जयराम पाटील यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले असून, उपमहापौर पदासाठी प्रमिला रविनाथ पाटील यांना उमेदवारी देण्यात आली आहे. उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर नितीन पाटील आणि प्रमिला पाटील यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेऊन आशीर्वाद घेतले.




या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी दोन्ही उमेदवारांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले आणि त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे जिल्हा चिटणीस रविशेठ पाटील, महाराष्ट्र वाहतूक संघनेटचे अध्यक्ष प्रभुदास भोईर, शहर उपाध्यक्ष प्रीतम म्हात्रे, शहर सरचिटणीस रूपेश नागवेकर, अमोल पालवे, केशव यादव, विजय नवले, मच्छिंद्र कुरुद, ॲड. प्रविण पाटील, संजय दोडके, चांदपाशा शेख, अमृताला चव्हाण, संतोष वाढेकर, जित दुबे, दिपक दुबे, नेहरु राणापुर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

# आमचा विजय निश्चित -भूपेंद्र पाटील

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यात जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांसाठी अत्यंत शांततापूर्ण आणि उत्साही वातावरणात मतदान प्रक्रिया पार पडत आहे. सकाळपासूनच मतदारसंघातील विविध केंद्रांवर मतदारांनी मतदानासाठी लांबच लांब रांगा लावल्या असून, लोकशाहीच्या या उत्सवात नागरिक उत्स्फूर्तपणे सहभागी होताना दिसत आहेत.

या निवडणूक प्रक्रियेदरम्यान भाजप महायुतीचे आदई पंचायत समिती गणाचे अधिकृत उमेदवार भूपेंद्र पाटील यांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावला. मतदान केल्यानंतर माध्यमांशी बोलताना त्यांनी सर्व नागरिकांना घराबाहेर पडून मतदान करण्याचे आणि आपले राष्ट्रीय कर्तव्य पार पाडण्याचे आवाहन केले. या वेळी भूपेंद्र पाटील सांगितले की, प्रचारादरम्यान आम्हाला मतदारांचा मिळालेला प्रतिसाद अभूतपूर्व असून, आम्ही प्रचारात घेतलेली मोठी आघाडी पाहून विरोधकांची झोप उडाली आहे. मतदारसंघात महायुतीला मिळणारे जनसमर्थन पाहता आमचा विजय निश्चित असल्याचाविश्वास त्यांनी व्यक्त केला.

संपूर्ण तालुक्यात प्रशासनाकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला असून, कुठेही अनुचित प्रकार न घडता मतदान प्रक्रिया सुरळीतपणे सुरू आहे.









पनवेल : रायगड जिल्हा परिषद आणि पनवेल पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी माजी पंचायत समिती सदस्य रत्नप्रभा घरत, माजी उपसरपंच विजय घरत आर्दीनी मतदानाचा हक्क बजावल्यानंतर विविध मतदान केंद्रांना भेटी दिल्या.




खालापूर : वासांबे जिल्हा परिषद आणि रिस पंचायत समिती व वासांबे पंचायत समिती गण निवडणूक मतदानावेळी पनवेल पंचायत समितीच्या माजी सदस्य रत्नप्रभा घरत व वर्षा ठाकूर, नगरसेवक सुमित झुंझारराव यांनी मतदान केंद्रास भेट दिली. या वेळी उमेदवार नेहा पारंगे व पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.




पनवेल : भाजप महायुतीचे केळवणे जिल्हा परिषद गटाचे उमेदवार मंगेश वाकडीकर व केळवणे पंचायत समिती गणाच्या उमेदवार शितल माळी यांनी आपला मतदानाचा हक्क बजावला.









# सुभाष घईंच्या दिग्दर्शनाची यशस्वी पन्नाशी

झूम प्रहर



दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक

तुम्हालाही माहित्येय आज आपण डिजिटल युगात वावरतोय, चित्रपट माध्यमात व्हीएफएक्स आणि एआय तंत्रज्ञानाचा वापर वाढलाय, हे नवीन तंत्रज्ञान आपण शिकायला हवं असं वाटणं अगदी स्वाभाविक आहे. पण सुभाष घईनेही असाच विचार करावा? होय सध्या सुभाष घई एआय तंत्रज्ञानाचा अभ्यास करताहेत.

सुभाष घईचे हे चित्रपट दिग्दर्शनातील पन्नासावे वर्ष. त्यांनी दिग्दर्शित केलेला एन. एन. सिप्पी दिग्दर्शित कालीचरण मुंबईत प्रदर्शित ६ फेब्रुवारी १९७६. (मेन थिएटर जमुना). या चित्रपटाच्या प्रदर्शनास पन्नास वर्षे पूर्ण झाली आहेत. म्हणजेच सुभाष घईच्या दिग्दर्शनाची यशस्वी पन्नाशी सुरू आहे.

सुभाष घईना दिग्दर्शनाची ही संधी त्यांच्याकडे असलेल्या गोष्ट सांगण्याच्या त्यांच्या खुबी मुळे मिळाली. ते आणि बी. बी. भल्ला हे पटकथाकार. त्यात सुभाष घई निर्मात्यांना गोष्ट रंगवून खुलवून सांगत. एन. एन. सिप्पी यांनाही त्यांनी अशाच खास शैलीत गोष्ट ऐकवली. तेव्हा एन. एन. सिप्पी यांच्या लक्षात आले की ही गोष्ट ऐकत असताना जणू चित्रपट डोळ्यासमोर येतोय. एन. एन. सिप्पी यांनी सुभाष घईना काही दिवसांनी येऊन भेटा असे सांगितले. या भेटीत तीच गोष्ट अधिकच नाट्यमयरित्या सुभाष घई यांनी त्यांना सांगितले आणि म्हटले, तुमच्याकडे गोष्ट सांगण्याचे कसब आहे. तुम्हीच या चित्रपटाचं दिग्दर्शन का करत नाही? सुभाष घई यांना एकाच वेळी एक सुखद संधी आणि आव्हान होते. चित्रपट दिग्दर्शन म्हणजे काय हे माहित नसल्याने नेमका काय निर्णय घ्यावा हे सुभाष घईना समजेना, पण एक चांगली संधी आहे असा विचार करत त्यांनी एन. एन. सिप्पी यांना होकार दिला. आणि दिग्दर्शक म्हणून सुभाष घई यांच्या वाटचालीला सुरुवात झाली. सिप्पी यांची अपेक्षा होती राजेश खन्नाला घेऊन हा चित्रपट निर्माण व्हावा. सुभाष घईनी आपला मित्र शत्रुघ्न सिन्हाला घेऊन कालीचरण दिग्दर्शित करायचं ठरवले. कथा सुभाष घई आणि बी. बी. भल्ला यांची, पटकथा राम केळकर यांचे आणि संवाद जैनेन्द्र जैन यांचे. छायाचित्रणकार के. के. महाजन आणि संकलन वामन भोसले आणि गुरुदत्त शिराली यांचे.

शत्रुघ्न सिन्हाची दुहेरी भूमिका (वरिष्ठ पोलीस अधिकारी प्रभाकर आणि कालीचरण), जोडीला रिना रॉय, प्रेमनाथ, अजित, मदन पुरी, डॅनी डेन्झोप्पा, अलका, विजू खोटे, डेव्हिड, दिनेश ठाकूर, कृष्ण धवन वगैरे वगैरे. चित्रपटाची गीते राजकवी इंद्रजीत सिंग तुलसी आणि रवींद्र जैन यांची तर संगीत कल्याणजी आनंदजी यांचे!

अतिशय नाट्यमय घडामोडी घडत घडत हा मसालेदार मनोरंजक चित्रपट खुलला. पब्लिकला आवडला. काही डायलॉग आणि गाणी लोकप्रिय झाली आणि पिक्चर सुपरहिट. या चित्रपटाची त्यानंतर कन्नड, तेलुगू, तमिळ आणि मल्याळम या प्रत्येक भाषेमध्ये रिमेक झाली. हेदेखील यशच.

सुभाष घईच्या दिग्दर्शनातील पन्नाशीतील लक्षवेधक गोष्ट, त्यांच्या चित्रपटातील गीत संगीत नृत्याची बहारदार मेजवानी...

जा रे जा ओ हरजाई (कालीचरण), ओम शांती ओम, शांती शांती ओम, दर्दे दिल दर्द जिगर दिल मे बसाया आपने (कर्ज), तू मेरा हीरो है, मै तेरी दिलबर हू, प्यार करनेवाले कभी डरते नही (हीरो), ये जी ओ जी सुनलो मनमौजी, मै हू राम लखन (राम लखन), ये इलू इलू क्या है...., इमली का बूटा (सौदागर), चोली के पीछे क्या है... नायक नही खलनायक हू मै (खलनायक), किसी रोज तुमसे मुलाकात होगी, दो दिल मिल रहे है (परदेस), ताल से ताल मिला, दिल ये बेचैन वे (ताल)

हे प्रत्येक गाणे पडदाभर दृश्य सौंदर्याचा छान प्रत्यय देते. नाच गाना हे तर आपल्या हिंदी चित्रपट संस्कृतीचे हे सर्वात मोठे वैशिष्ट्य आणि पारंपरिक प्रेक्षकांना आवर्जून आवडणारी गोष्ट म्हणजे, रुपेरी पडद्यावरची गाणी हे सूत्र सुभाष घईला नेमके उमगले आणि त्याचा त्याने जणू पडदाभर सढळ हस्ते वापर केला आणि आपला स्वतः चा हुकमी प्रेक्षकवर्ग निर्माण केला. त्याच्या यशात दूरदृष्टी, मेहनत, सातत्य आणि शोमनशीप या गुणांचे छान मिश्रण आहे.तसेच आणखीन एक गोष्ट आहे, ती म्हणजे, अडचणीत अडकून न पडता नवीन मार्ग काढत/शोधत पुढे जात राह्यचे.

सुभाष घई खरंतर अभिनय करण्यासाठी चित्रपटसृष्टीत पाऊल टाकले. पुण्यातील फिल्म ॲण्ड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूटमध्ये चित्रपट माध्यमाचे प्रशिक्षण घेतल्यावर सुभाष घईने फिल्म फेअरच्या नवीन चेहरे स्पर्धेत भाग घेतला. त्याच स्पर्धेत राजेश खन्ना विजेता तर धीरजकुमार व सुभाष घई उपविजेते ठरले. सुभाष घईने राजश्री प्रॉडक्सन्सच्या 'तकदीर ' (१९६७) या चित्रपटात भूमिका साकारत सुभाष घईने अभिनेता म्हणून वाटचाल सुरु केली. आणि मग अभिनेता म्हणून उमंग (१९७०), ग्रहण (१९७२), नाटक, गुमराह (१९७३) वगैरे काही चित्रपटात भूमिका साकारली. यापैकी 'ग्रहण ' या चित्रपटात नूतन नायिका आहे, तर 'गुमराह'मध्ये रिना रॉय नायिका आहे. पण या चित्रपटांना अजिबात यश न मिळाल्याने सुभाष घईपुढे आव्हान निर्माण झाले. शक्ती सामंता दिग्दर्शित 'आराधना' (१९६९) मध्ये सुभाष घईने राजेश खन्नाच्या पायलट मित्राची भूमिका साकारलीय.. सिनेमा खणखणीत यशस्वी ठरला पण सुभाष घईने सहनायकाच्या भूमिका स्वीकारण्यापेक्षा बी.बी. भल्ला याला जोडीला घेऊन पटकथा लेखक म्हणून करियरला वळण दिले. आणि खान दोस्त वगैरे चित्रपट लिहिले. अशा पध्दतीने बदल स्वीकारुन आपण बदलण्यास तयार आहोत हे दाखवून दिले आणि याच त्याच्या वृत्तीने त्याची वाटचाल घडवली असे दिसेल. आणि कालांतराने सुभाष घई ऐंशी– नव्वदच्या दशकातील शोमन म्हणून ओळखले गेले.

'कालीचरण 'पासून त्यांची दिग्दर्शक म्हणून वाटचाल सुरु झाली..... तरीदेखील सुभाष घई या नावाचा दबदबा निर्माण होण्यासाठी यशापयशाचा अनुभव घ्यावा लागला. शत्रूघ्न सिन्हाचा सेक्रेटरी पवनकुमार निर्मित 'विश्वनाथ' (शत्रूघ्न सिन्हा, रिना रॉय, रणजित इत्यादी)ने जेमतेम यश मिळवले. पण 'गौतम गोविंदा' ( शशी कपूर, शत्रूघ्न सिन्हा, मौशमी चटर्जी), रणजित विर्क निर्मित 'क्रोधी' (धर्मेंद्र, शशी कपूर, झीनत अमान) या चित्रपटाच्या फ्लॉप्सने सुभाष घईच्या क्षमतेविषयी शंका व्यक्त होऊ लागली. चित्रपटाच्या जगात अपयश म्हणजे मागे पडणे होय, पण सुभाष घईकडे 'हुकमाचा एक्का' होता. 'जॉनी मेरा नाम' (दिग्दर्शक विजय आनंद), 'दीवार' (दिग्दर्शक यश चोप्रा) या चित्रपटाचे निर्माते गुलशन रॉय यांचा त्रिमूर्ती फिल्मचा 'विधाता' (१९८१)चे दिग्दर्शन सुभाष घईकडे होते आणि त्याने या चित्रपटासाठी दिलीपकुमार, शम्मी कपूर, संजीवकुमार असे तगडे स्टार एकत्र आणले. जोडीला अमरिश पुरी, संजय दत्त, पद्मिनी कोल्हापूरे होते. या चित्रपटात सुभाष घईला चांगलाच सूर सापडला, सिनेमा भरपेट मनोरंजन करणारा ठरला आणि चित्रपट सुपर हिट झाला. सात सहेलिया खडी खडी हे गाणे यातीलच! आणि पुनर्जन्माच्या सूडकथेवरचा सुभाष घईचा 'कर्ज' (ऋषि कपूर, टीना मुनिम, सिमी गरेवाल, राज किरण) सुपर हिट झाला. या चित्रपटाचे निर्माता राकेश मल्होत्रा होता.

दिग्दर्शक म्हणून आता जम बसत असतानाच सुभाष घईने आता निर्माता म्हणून पाऊल टाकले . आपली मुक्ता आर्टस ही निर्मिती संस्था स्थापन केली. जॅकी श्रॉफ आणि मीनाक्षी शेषाद्री या जोडीला घेऊन 'हीरो' (१९८३) साकारला. जॅकी श्रॉफ मॉडेलिंगकडून सिनेमात आला होता, देव आनंदने त्याला 'स्वामी दादा'मध्ये अगदी छोटीसी व्हीलनची संधी दिली, तर मनोजकुमारच्या 'पेंटर बाबू'तून मीनाक्षी शेषाद्री सिनेमाच्या जगात आले. दोघांचेही पहिले चित्रपट फ्लॉप्स झाले, पण 'हीरो' सुपर हिट झाला. या चित्रपटात शम्मी कपूर, संजीवकुमार, बिंदू अशी जबरदस्त सपोर्ट सिस्टीम होती.

'हीरो'च्या खणखणीत यशाने सुभाष घई या नावाचा दबदबा निर्माण झाला. त्यासह घईच्या चित्रपटाला लक्ष्मीकांत प्यारेलाल यांचे संगीत असेही समिकरण बराच काळ घट्ट झाले. त्यानंतर घईने इतर निर्मात्यांसाठीचा 'मेरी जंग' (नूतन, अनिल कपूर, मीनाक्षी शेषाद्री) हा एकमेव चित्रपट दिग्दर्शित केला. हा चित्रपट निर्माते एन. एन. सिप्पी यांचा होता. या चित्रपटाचा वांद्रे येथील मेहबूब स्टुडिओतील मुहूर्त मला आजही आठवतोय. अनिल कपूरने दणक्यात संवाद म्हटला होता. या चित्रपटाचे लेखन जावेद अख्तरचे आहे. अन्यथा सुभाष घईने बराच काळ राम केळकर यांच्या पटकथेवर चित्रपट दिग्दर्शित केले. सुभाष घई म्हणजे हमखास ज्युबिली हिट असे जबरदस्त समीकरण मग 'कर्मा' (दिलीपकुमार, नूतन, नसिरुद्दीन शहा, अनिल कपूर, जॅकी श्रॉफ, श्रीदेवी, पूनम धिल्लॉन, अनुपम खेर. याही चित्रपटाचा ऐन दिवाळीच्या दिवशी मेहबूब स्टुडिओत रंगलेला भव्य मुहूर्त आजही आठवतोय. आपल्या चित्रपटाच्या मुहूर्तावरही आपला प्रभाव असावा असाच सुभाष घईचा बाणा दिसला), राम लखन (राखी, अनिल कपूर, जॅकी श्रॉफ, माधुरी दीक्षित, डिंपल कपाडिया, अमरिश पुरी, अनुपम खेर), सौदागर (दिलीपकुमार, राजकुमार, जॅकी श्रॉफ, तसेच तेव्हा नवीन चेहरे विवेक मुशरन आणि मनिषा कोईराला), खलनायक (राखी, संजय दत्त, माधुरी दीक्षित, अमरिश पुरी)... सुभाष घईचा हा १९९३ पर्यंतचा सतत उंचावलेला आलेख. प्रत्येक चित्रपट ज्युबिली हिट. सुभाष घईने प्रेक्षकांची नाडी बरोबर ओळखली असे म्हटले गेले. आणि या प्रवासात आपल्या प्रत्येक चित्रपटात सुभाष घईने छोटीशी का होईना पण एखाद्या गाण्यात भूमिका साकारलीय. आपण मूळचे अभिनेते आहोत याचा त्याने विसर पडू दिला नाही.

अशातच सुभाष घईने मुकुल आनंदकडे दिग्दर्शन सोपवून ऐन दिवाळीच्या दिवशी जुहूच्या एका पंचतारांकित हॉटेलमध्ये 'त्रिमूर्ती' या चित्रपटाचा अतिशय थाटात मुहूर्त केला. संजय दत्त, जॅकी श्रॉफ आणि शाहरूख खान अशी जबरदस्त स्टार कास्ट असल्याने हा मुहूर्त प्रचंड गाजत असतानाच संजय दत्तला मुंबई बॉम्बस्फोट प्रकरणात पुन्हा एकदा अटक करण्यात आली आणि या चित्रपटात त्याच्या जागी अनिल कपूर आला. हा चित्रपट निर्मितीवस्थेत फारच रखडला आणि एकदाचा प्रदर्शित झाल्यावर फ्लॉप झाला. याच फ्लॉपनंतर संगीतकार लक्ष्मीकांत प्यारेलाल हे मुक्ता आर्टसबाहेर पडले. हे अपयश सुभाष घईचे मानले गेले. त्यानंतर सुभाष घईच्या 'परदेस' (शाहरूख खान आणि महिमा चौधरी)ला चांगले तर 'ताल' (अनिल कपूर, ऐश्वर्या रॉय, अक्षय खन्ना, संगीत ए. आर. रेहमान)ने बरे यश मिळवले. पण 'यादे (जॅकी श्रॉफ, हृतिक रोशन, करिना कपूर) सुपर फ्लॉप झाला आणि सुभाष घईची घसरण सुरु झाली. आता त्याच्या 'जुन्या चित्रपटाच्या आठवणी' काढल्या जाऊ लागल्या. त्यानंतर सुभाष घईने युवराज (सलमान खान, कैतरिना कैफ), किसना (विवेक ओबेरॉय, इशा श्रावणी, अमरिश पुरी), ब्लॅक ॲण्ड व्हाईट (अनिल कपूर) या चित्रपटांचे दिग्दर्शन केले, पण त्यात तो सुभाष घई टच नव्हता. एव्हाना हिंदी चित्रपटही खूपच बदलला होता. त्याची सुरुवात आदित्य चोप्रा दिग्दर्शित 'दिलवाले दुल्हनिया ले जाऐंगे' (१९९५) ने झाली होती आणि त्या बदलाशी दिग्दर्शक म्हणून सुभाष घईला जुळवून घेता आले नाही, पण तोपर्यंत त्याच्या मुक्ता आर्टस या बॅनरचा जम बसला होता. ओशिवरा भागात भारी मोठे ऑफिस थाटले होते. निर्माता म्हणून सुभाष घईची खेळी सुरु राहिली. नागेश कुकूनर दिग्दर्शित 'इक्बाल' (२००६)ला राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार प्राप्त झाला हा मुक्ता आर्टसचा गौरव झाला. श्रेयस तळपदेचे हिंदी चित्रपटसृष्टीतील पहिले पाऊल यशस्वी ठरले. त्यानंतर सुभाष घईच्या मुक्ता आर्टसने राहुल, ऐतराज, ३६ चायना टाऊन, अपना सपना मनी मनी, जॉगर्स पार्क, एक और एक ग्यारह वगैरे हिंदी तसेच सनई चौघडे, संहिता या मराठी चित्रपटाची निर्मिती केली.त्यांनी 'विजेता' या मराठी चित्रपटाची निर्मिती केली.

सुभाष घईच्या दिग्दर्शनातील तीन चित्रपटात (विधाता, कर्मा आणि सौदागर) दिलीपकुमारने भूमिका साकारलीय, पण अमिताभ बच्चनचे काय? सुभाष घईने बीग बीला वेगळ्या गेटअप आणि पोशाखातील भूमिका देत 'देवा' (१९८९) या चित्रपटाचा भव्य ग्लॅमरस मुहूर्त केला. या चित्रपटाला राहुल देव बर्मनचे संगीत होते. गोरेगावच्या फिल्मीस्थान स्टुडिओतील या चित्रपटाच्या सेटवर आम्हा मिडियाला अजिबात प्रवेश नव्हता. त्यामुळे तर या चित्रपटात नेमके काय बरे असेल याची उत्सुकता वाढली, पण ते पहिले चित्रीकरण सत्र संपले आणि हा चित्रपटच डब्यात गेला तो कायमचा! आणि सुभाष घईच्या दिग्दर्शनातील चित्रपटात बीग बी हा योग दुर्दैवाने साध्य होऊ शकला नाही आणि राहुल देव बर्मनचे घईच्या चित्रपटाला संगीत हेदेखील घडायचे राहिले.

सुभाष घईने आपल्या करियरचा खूप चांगला विस्तारवाद केला. त्याने गोरेगावच्या फिल्म सिटीमध्ये चित्रपट माध्यमाच्या अभ्यासक्रमाची प्रचंड मोठी अशी व्हीसलिंग वूड ही संस्था स्थापन केली. तेथे भव्य मिनी थिएटरपासून या माध्यमासाठीचे आधुनिक तंत्रज्ञान आहे. सुभाष घईचे हे नवीन पिढीला खूपच मोठे देणे आहे.

सुभाष घईचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे मिडिया फ्रेन्डली असणे. आपल्या नवीन चित्रपटाच्या मुहूर्तापासून प्रीमियरपर्यंत मिडियाला आवर्जून बोलावणार. अनेकदा तरी आउटडोअर्स शूटिंगसाठी नेणार. भरपूर गप्पा करणार. फार पूर्वी सुभाष घईच्या स्वतंत्र मुलाखतीचेही योग आले असता असे जाणवले की, हा माणूस प्रचंड गप्पिष्ट आहे. खूप किस्से आणि आठवणीने गप्पा रंगवणार.

सुभाष घईच्या दोन गोष्टी सांगायला हव्या. त्याच्याकडूनच पूर्वी त्या समजल्या. 'कर्ज' या चित्रपटातील दर्दे दिल दर्द जिगर... या गाण्याचे पहिल्या दिवसाचे शूटिंग संपल्यावर ऋषि कपूरने सुभाष घईला सांगितले, इतर गाण्यांप्रमाणेच या गाण्यालाही नृत्य दिग्दर्शक हवाय. सुभाष घई शांतपणे म्हणाला, मी हे गाणे पूर्णपणे चित्रीत करतो, त्यानंतर आपण रश प्रिन्ट पाहून ठरवू काय करायचे ते. त्यानुसार जेव्हा हे गाणे एडिट झाल्यावर ऋषि कपूरने पाहिले तेव्हा त्याने सुभाष घईला प्रचंड दाद दिली..... सुभाष घई आवश्यक तेथेच नृत्य दिग्दर्शकाला संधी देई, इतकी त्याची गीत संगीत नृत्य सादरीकरणावर पकड. तर 'खलनायक'ची मूळ गोष्ट खूप वेगळी होती. कलात्मक चित्रपटाच्या पठडीतील चित्रपट बनवायचा म्हणून त्यानी नाना पाटेकरला साईन करायचे ठरवले. नाना पाटेकरसोबत तीन मिटींग झाल्यावर सुभाष घईच्या लक्षात आले की, बहुदा आपण सेटबाहेर बसणार आणि नाना सर्व चित्रपटच हाती घेणार. सुभाष घईने नाना पाटेकरचा नाद सोडला आणि पटकथेत फेरफार करून महामनोरंजक चित्रपट निर्माण करायचे ठरवून संजय दत्तला साईन केले...

सुभाष घई सतत काही ना काही उलाढाल करणारा सिनेमावाला. म्हणून तर स्वतः ची ओळख आणि स्थान निर्माण करण्यात यशस्वी ठरलाय.

## ज्येष्ठ समाजसेविका डॉ. इंदूताई पटवर्धन



समाजाने दूर अंधःकारात लोटलेल्या कुष्ठरोग्यांच्या जीवनात आनंद निर्माण करणाऱ्या ज्येष्ठ समाजसेविका, राजकुमारी डॉ. इंदुताई पटवर्धन यांचा आज जन्मदिन. त्यांचा जन्म जमखिंडीच्या राजघराण्यात १४ मे १९२६ रोजी झाला.

इंदुताईंचे शिक्षण जमखिंडी व कोल्हापूर येथे झाले. राजकुमारी म्हणून जन्मलेल्या इंदूताईंनी १६व्या वर्षी गांधीजींच्या चळवळीस वाहून घेतले. मॉंटेसरी शिक्षणक्रम पूर्ण करून त्या सेंट कोलंबो स्कूलमध्ये शिक्षिका बनल्या. पुढे ब्रिटिश इंडियन रेड क्रॉस आणि सेंट जॉन ॲम्ब्युलन्सच्या कामामध्ये दाखल झाल्या. दुसऱ्या महायुद्धातल्या प्रत्यक्ष युद्धभूमीवर जखमी लष्करी जवानांचे शुश्रुषेसाठी ब्रह्मदेश, जावा येथे गेल्या. सिंगापूर, जपान, येथेही त्यांनी काम केले. वर्ष १९५३मध्ये सेवेतून निवृत्त झाल्यावर त्यांनी होमिओपॅथीचे शिक्षण घेतले. खेड शिवापूर येथे दवाखाना सुरू केला. पूना विमेन्स काउंसिलचे कामही त्या करीत होत्या. पूना ब्लाईंड मेन्स असोसिएशनच्या त्या संस्थापक सदस्या होत्या. लष्करातील जवान व आदिवासी समाजातील आजारी, जखमी रुग्णांची सेवा करत त्यांनी आपले आयुष्य अर्पण केले. त्यासाठी त्या जन्मभर अविवाहित राहिल्या.


मुंबई इलाख्यात आपले जमखंडी संस्थान विलीन करणारे त्यांचे भाऊ राजा परशुराम शंकरराव पटवर्धन हे भारतीय राजघराण्यांपैकी पहिले संस्थानिक होते. पुणे येथील पूना कॉलेजला सर परशुरामभाऊ पटवर्धन यांच्या स्मरणार्थ दोन लाख रुपये इतकी देणगी त्यांनी दिली होती व तेव्हापासून ते कॉलेज सर परशुरामभाऊ कॉलेज (एस. पी. कॉलेज) म्हणून ओळखले जाऊ लागले.

ऑक्सफॉम या संस्थेकडून १९६१ साली मिळालेल्या १७ हजार रुपयांच्या मदतीवर पुण्याजवळच्या डुडळगाव येथील एका ओसाड जागेवर आनंदग्राम' नावाने कुष्ठरोग्यांची वसाहत उभी केली. पश्चिम महाराष्ट्रात पुण्याजवळ कुष्ठरोग सेवाकेंद्र सुरू करणाऱ्या त्या पहिल्या महिला कार्यकर्त्या आहेत. वर्ष १९६५मध्ये महाराष्ट्र शासनाचा भिक्षा प्रतिबंध कायदा अमलात आल्यावर त्यांनी ८० रुग्णांसह कुष्ठरोग्यांसाठी प्रत्यक्षात वर्ष १९६५मध्ये काम सुरू केले. आळंदी जवळच्या सध्याच्या आनंदग्राम' येथे वर्ष १९७० मध्ये त्यांनी स्थलांतर केले.

उला लेडी हाइड पार्कर, राधा रमणजी अशा व्यक्तींच्या सहाय्यामुळे आनंदग्राम'ला सध्याचे विशाल स्वरूप आल्याचा त्या कृतज्ञतेने उल्लेख करतात. सध्या आश्रमात राहणाऱ्यांकडून येथे शेती, कुक्कुटपालन, गोपालन, कापड उद्योग आदी अनेक उपक्रम यशस्वीपणे चालविले जातात. रेशमासाठी तुती इत्यादीची लागवड केली जाते. मुला–मुलींनी फुलून आलेल्या शाळा, शेतीला नियोजन करून दिलेले पाणी, सदैव कार्यरत असलेले हात, हे आनंदग्रामचे आजचे आदर्शवत ठिकाण झाले आहे. खाद्यतेल सोडले तर सर्व काही इथेच बनते, धान्य पिकते, हातमागावर कपडे तयार होतात, दवाखाना, केशकर्तनालय इथे आहे. गोबर गॅस बनतो. इतके स्वयंपूर्ण गाव येथे त्यांनी उभे केले.

इंदुताई पटवर्धन यांच्या कार्याची दाखल घेऊन शासनाने त्यांना दलितमित्र हा पुरस्कार दिला. ८ फेब्रुवारी १९९९ रोजी त्यांचे निधन झाले. (साभार : इंटरनेट)

## ख्यातनाम शिक्षणतज्ज्ञ झाकिर हुसेन



भारताचे तिसरे राष्ट्रपती, एक ख्यातनाम शिक्षणतज्ज्ञ आणि भारत सरकारतर्फे दिल्या जाणाऱ्या सर्वोच्च अशा भारतरत्न पुरस्काराचे मानकरी झाकिर हुसेन. त्यांचा जन्म ८ फेब्रुवारी १८९७ रोजी अफ्रिडी अफगाण मुसलमान कुटुंबात हैदराबाद (सिंध) येथे झाला. त्यांचे वडील वकील होते. झाकिर हुसेन नऊ वर्षांचे असतानाच त्यांचे वडील वारले. त्यामुळे झाकिर हुसेन यांना शिक्षणासाठी इटावा, अलीगढ आणि बर्लिन इत्यादी ठिकाणी फीरावे लागले. त्यांनी अर्थशास्त्र विषयात पीएच. डी. पदवी मिळविली. ही पदवी मिळविण्यापूर्वी ते १९२० मध्ये जामिआ मिल्लिया इस्लामिया या शिक्षणसंस्थेकडे आकर्षित झाले होते.

जर्मनीहून भारतात परत येताच त्यांनी आपले सर्व जीवन या संस्थेस समर्पित केले. १९२५ मध्ये ही संस्था दिल्लीस हलविण्यात आली व झाकिर हुसेन १९२६ मध्ये तिचे कुलगुरू झाले. त्यांनी जवळजवळ बावीस वर्षे (१९२६–४८) या संस्थेचे कार्य केले व तिला एका अभिनव शिक्षणसंस्थेचे स्वरूप दिले.

झाकिर हुसेन यांची शैक्षणिक वाटचालीतील स्फूर्तिस्थाने दोन होती : महात्मा गांधी (Mahatma Gandhi) व जर्मन शिक्षणशास्त्रज्ञ केर्शेनस्टाइनर. विद्यापीठात बौद्धिक स्वातंत्र्य, विचारस्वातंत्र्य व भाषणस्वातंत्र्य पुरेपूर असावे आणि व्यासंगी विद्वानांचे ते सभास्थान व्हावे; कारण अशा वातावरणात विद्यार्थ्यांचे नीतिधैर्य विकास पावते, अशी त्यांची धारणा होती. त्यांनी स्वयंशिक्षणावर भर देऊन नव्या शैक्षणिक कल्पना जामिआ मिल्लियामध्ये रुजविल्या. ते अलीगढ मुस्लिम विद्यापीठाचे कुलगुरू झाले (१९४८–५६). १९५६ साली ते राज्यसभेवर निवडून आले. पुढे ते बिहारचे राज्यपाल झाले आणि नंतर उपराष्ट्रपती म्हणून निवडले गेले (१९६२). १९६७ मध्ये ते भारताचे राष्ट्रपती झाले.

झाकिर हुसेन यांनी अनेक शैक्षणिक समित्यांवर काम केले. त्यांपैकी यूनेस्को, विद्यापीठ अनुदान आयोग, मध्यवर्ती माध्यमिक मंडळ, विद्यापीठीय शैक्षणिक आयोग ह्या काही महत्त्वाच्या संस्था होत. त्यांना अनेक परदेशीय आणि भारतीय विद्यापीठांनी डी. लिट्. ही सन्माननीय पदवी देऊन गौरविले आहे. भारत सरकारने त्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील कार्याचा यथोचित गौरव पद्मविभूषण (१९५४) हा पुरस्कार देऊन केला. महात्मा गांधींचे ते प्रथमपासून निष्ठावान अनुयायी होते. १९३७ मध्ये महात्मा गांधींनी त्यांना मूलोद्योग शिक्षण समितीचे अध्यक्ष केले. आयुष्यभर त्यांनी या शिक्षणपद्धतीचा पुरस्कार केला.

झाकिर हुसेन यांनी शिक्षण, अर्थशास्त्र वगैरे विषयांचे आपले विचार अनेक व्याख्यानांद्वारे मांडले. त्यांपैकी काही व्याख्याने द डायनॅमिक युनिव्हर्सिटी या पुस्तकाच्या नावाने प्रसिद्ध झाली आहेत. जर्मन भाषेमध्ये त्यांनी म. गांधींचे चरित्र लिहिले, तसेच प्लेटोच्या रिपब्लिकचे उर्दूत भाषांतर केले. लहान मुलांकरिता काही गोष्टीही त्यांनी लिहिल्या आहेत. स्फटिकांचा आणि चित्रविचित्र खड्यांचा संग्रह करणे, हा झाकिर हुसेन यांचा आवडता छंद होता. ते ग्रंथप्रेमी होते व त्यांचे ग्रंथालय नव्यानव्या ग्रंथांनी नेहमी भरलेले असे. एक नेमस्त, चारित्र्यवान व शिक्षणतज्ज्ञ असा राष्ट्रीय मुस्लिम नेता म्हणून त्यांचे कार्य महत्त्वाचे आहे. झाकिर हुसेन राष्ट्रपती असतानाच नवी दिल्ली येथे ३ मे १९६९ रोजी हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचे निधन झाले. (साभार : इंटरनेट)

# आधी लगीन लोकशाहीचे...! बोहल्यावर चढण्यापूर्वी नवरदेवांनी बजावला मतदानाचा हक्क



**महाड : रामप्रहर वृत्त**

महाड तालुक्यातील चांढवे खुर्द येथील रहिवासी असणारे विशाल उतेकर यांनी आज (दि.८) आपल्या विवाहदिनी 'आधी लगीन लोकशाहीचे' म्हणत बोहल्यावर चढण्यापूर्वी मतदानाचा हक्क बजावला.

तरुणांमध्ये मतदान जनजागृती होऊन मतदानाचे गांभीर्य तरुणांना कळावे यासाठी आपण आपल्या आयुष्यातील महत्त्वाच्या दिनी मतदानाला देखील प्राधान्य दिल्याचे मतदान केल्यानंतर विशाल यांनी सांगितले.

महाड तालुक्यात रायगड जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या एकूण मतदानासाठी एक लाख ३९ हजार ४४६ मतदारांपैकी दुपारी साडेअकरा वाजेपर्यंत पुरुष २० हजार ७३ तर स्त्री १७४७६ मिळून ३७५९ मतदारांनी आपला हक्क बजावला असून याची टक्केवारी २६.९३ एवढी आहे.

**धाटाव : प्रतिनिधी**

लोकशाहीप्रती जबाबदारी जपत रोहा तालुक्यातील वाशी गावचे कुमार मयूर मधुकर लहाने यांनी एक आदर्श उदाहरण घालून दिले आहे.शुक्रवार, ७ फेब्रुवारी रोजी दुपारी शुभविवाह असतानाही, लग्नाच्या मुहूर्तापूर्वी त्यांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. गावाच्या आणि परिसराच्या विकासासाठी मतदान महत्त्वाचे आहे, या जाणिवेतून त्यांनी सर्वप्रथम मतदान केंद्र गाठले आणि त्यानंतर विवाह विधीकडे रवाना झाले.





**कर्जत : नेरळमधील रोशन लोभी, अंथ्रड गावातील संदेश धुळे यांचा विवाह आज होता. त्यांनी प्रथम मतदानाचा हक्क बजावला आणि नंतर ते विवाह सोहळ्यासाठी रवाना झाले, तर नेरळमधील साहिल जैन याचा हळदी समारंभ होता. त्यानेही मतदान करून हळदी समारंभ गाठला.**

## माणगाव तालुक्यात जिल्हा परिषद आणि पंचायत समितीसाठी शांततेत मतदान

**माणगाव : प्रतिनिधी**


रायगड जिल्हा परिषद व पंचायत समितीसाठी माणगाव तालुक्यातील निजामपूर जिल्हा परिषद गट, तळाशेत जिल्हा परिषद गट,मोर्बा जिल्हा परिषद गट,गोरेगाव जिल्हा परिषद गट,पाटणूस पं.स.गण, निजामपूर पं.स.गण,तळाशेत पं.स.गण,साई पं.स.गण,वडवली पं.स.गण मोर्बा पं.स.गण,गोरेगाव पं.स.गण,लोणेरे पं.स.गण याठिकाणी शनिवार दि. ७ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ७ : ३० ते सायंकाळी ५ :३० यावेळेत शांततेत मतदान झाले.



तालुक्यात दुपारी ३:३० वाजेपर्यंत ५२ टक्के इतके मतदान झाल्याची माहिती निवडणुकीचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा माणगाव तालुक्याचे प्रांताधिकारी डॉ. संदीपान सानप यांनी दिली. तालुक्यातील सर्व मतदान केंद्रावर या निवडणुकीसाठी तालुक्याचे उपविभागीय पोलीस अधिकारी सविता गर्जे व माणगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांच्या मार्गदर्शनाखाली कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

मतदानाची प्रक्रिया पूर्ण झाल्याने माणगाव तालुक्यात माजी जि. प. सभापती ॲड .राजीव साबळे, अस्लम राउत, पत्रकार भरत गोरेगावकर उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत बंद झाले असून कोण निवडून येणार याची उत्सुकता तालुक्यातील जनतेला लागून राहिली आहे.

या निवडणुकीची मतमोजणी सोमवार दि.९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजल्यापासून मध्यवर्ती प्रशासकीय भवन माणगाव तहसील कार्यालय येथील भव्य सभागृहात होणार असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी यांनी प्रसार माध्यमांजवळ बोलताना दिली.



**पेण : रावे मतदान केंद्रात मतदानचा हक्क बजावताना पेण-सुधागड मतदारसंघांचे आमदार रविशेठ पाटील.**



**चौक : माजी आमदार व भाजप नेते देवेंद्र साटम त्यांच्या पत्नी दर्शना साटम व मुलगी जुई यांनी चौक येथील मतदान केंद्रावर मतदानाचा हक्क बजावला.**



**महाड : ९५ वर्षाच्या मनोरमा मोतीराम विचारे यांनी लाडवली या मतदान केंद्रावर जाऊन मतदान केले. मतदान न करणाऱ्या तरुणांना व आजही भारतात लोकशाही व निवडणूक यंत्रणेप्रती विश्वास देणारा हा संदेश आहे.**



**नागोठणे : जिल्हा परिषद गटाचे राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार किशोर जैन यांनी आपले वडील ओटरमलशेठ जैन व कुटुंबियांसमवेत आपला मतदानाचा हक्क बजावण्यासाठी मतदान केंद्रावर जाताना पहावयास मिळाले.**



**माणगाव : तालुक्यातील मोर्बा जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणासाठी मतदानाकरिता मोर्बा येथील मतदान केंद्रावर वयोवृद्ध महिलेला घेऊन येत असताना; तर मोर्बा ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच इकबाल हर्णेकर यांनीही आपला मतदानाचा हक्क बजावला.**

## सुधागडमध्ये मतदानाचा उत्साह

**पाली : सुधागड**

तालुक्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांसाठी शनिवारी (ता. ७) सकाळपासूनच मतदारांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळाला. दुपारी दीड वाजेपर्यंत तालुक्यात सरासरी ४३.५ टक्के मतदान झाले होते, दुपारनंतरही मतदान केंद्रांवर रांगा कायम होत्या. ही निवडणूक राजकीयदृष्ट्या अत्यंत चुरशीची मानली जात असून अनेक दिग्गजांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे.



सुधागड तालुक्यातील ही निवडणूक खासदार धैर्यशील पाटील यांच्या पत्नी तथा माजी जिल्हा परिषद अध्यक्षा ॲड. नीलिमा पाटील यांच्यासाठी अत्यंत प्रतिष्ठेची ठरली आहे. भाजपकडून त्या मैदानात असून त्यांच्यासमोर शिवसेनेच्या (शिंदे गट) शर्मिला शरद बोडके यांचे आव्हान आहे. दोन जिल्हा परिषद आणि चार पंचायत समिती जागांसाठी होत असलेल्या या लढतीच्या निकालाकडे आता संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

निवडणूक प्रक्रिया शांततेत पार पाडण्यासाठी प्रशासनाने जय्यत तयारी केली होती. तालुक्यात ९ झोनअंतर्गत एकूण ७५ मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली होती. मुंबई-रायगड युनिटचे ११० होमगार्ड, ६६ पोलीस कर्मचारी, ६ अधिकारी आणि पुणे युनिटकडून एसआरपीएफची एक तुकडी तैनात करण्यात आली होती.

पाली नगरपंचायत स्थापन झाल्यानंतरची ही पहिलीच जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणूक होती. पाली आता 'नागरी क्षेत्र' घोषित झाल्यामुळे येथील मतदारांची नावे जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या मतदार संघातून वगळण्यात आली आहेत. त्यामुळे या निवडणुकीत पालीतील नागरिक मतदान केले नाही. यामुळे अनेक वर्षांपासून ग्रामीण राजकारणात सक्रिय असलेल्या मतदारांमध्ये काहीसा हिरमोड झालेला दिसला, तसेच शहरात शांततेचे वातावरण होते.

## तळा तालुक्यात १४ उमेदवारांचे भविष्य मतदानयंत्रात बंद

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यात ७ फेब्रुवारी रोजी दोन जिल्हा परिषद व चार पंचायत समिती गणांसाठी झालेल्या निवडणुकीचे मतदान सकाळी सुरू झाले त्यावेळी मतदारांची सर्वच मतदान केंद्रांवर १२ वाजेपर्यंत गर्दी दिसून आली दुपारी हिच संख्या रोडवलेली पहावयास मिळाली.

पुरूष १५८९५ व महिला १६२२७ असे एकूण ३२१२२ मतदार आहेत. त्यापैकी दुपारपर्यंत पुरूष ७७६२ व महिला ७३८५ असे एकूण १५१४७ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला होता. एकूण दुपारी साडेतीन वाजेपर्यंत ४७.१५ टक्के मतदान झाले होते. या दिवशी चाकरमानी मतदारही मतदानास आल्याचे पहावयास मिळत होते. मतदान केंद्रांवरती दिव्यांगांसाठी व्हीलचेअर अशी चांगली सुविधा उपलब्ध असल्याची पहावयास मिळाली.

## कर्जतमध्ये शांततेत मतदान, सुमारे ७० टक्के मतदारांनी हक्क बजावला

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीसाठी सकाळपासूनच उत्साहात सुरुवात झाली. या निवडणुकीत सुमारे सत्तर टक्के मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. काही ठिकाणी मतदान यंत्र थोड्या वेळासाठी बंद पडली होती. काही ठिकाणी किरकोळ वादावादी वगळता मतदान शांततेत झाले.



आज सकाळी साडे सात वाजता मतदानाला सुरुवात झाली. थोडी थंडी असूनही मतदारांनी काही मतदान केंद्रावर गर्दी केली होती. पहिल्या दोन तासात एक लाख ७० हजार ७०२ मतदारांपैकी १९, १८० मतदारांनी आपला हक्क बजावला. त्यामुळे ११. २४ टक्के मतदान झाले. साडे अकरा वाजेपर्यंत ४९ हजार ५३९ मतदारांनी मतदान केले. त्यामुळे २९ . ०२ टक्के मतदान झाले. दीड वाजेपर्यंत ८१ हजार ४२८ मतदारांनी मतदान केल्याने टक्केवारी ४७. ७० वर गेली. साडे तीन वाजेपर्यंत एक लाख ८ हजार ३१ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. मतदानाची टक्केवारी झाली ६३ . २९ टक्के. काही मतदान केंद्रावर उशिरा पर्यंत सुरु होते. सुमारे सत्तर टक्के मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला.

काही ठिकाणच्या मतदान केंद्रावर सकाळीच रांगा लागल्या होत्या. महिला व जेष्ठ नागरिकांसाठी वेगळ्या रांगा होत्या. प्रभाग दोन व तीन मतदान केंद्रावरीलमधील यंत्रांमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने काही वेळ मतदान करणे बंद पडले होते.

## मुरुडमध्ये ७१ टक्के मतदान; मतदानासाठी महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**मुरुड : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ करिता तालुक्यातुन जिल्हापरिषद २ सदस्य पदाकरीता व पंचायत समिती ४ सदस्य पदाकरीता । ८१ मतदान केंद्र असुन या केंद्रावर आज सकाळी ७.३० ते दुपारी ३.३० च्या दरम्यान ५९.१३ टक्के मतदान झालं असुन सकाळी धिम्या गतीने तर दुपारी उत्साहाने मतदानला सुरुवात झाली आहे.या मध्ये मतदान करिता महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद दिसुन आला.



राजपुरी जिल्हा परिषद मतदार संघात शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार विघ्नेश माळी विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार अजित कासार यांच्यात कडवी लढत होणार आहे, तर कोर्लई जिल्हा परिषद मतदार संघात भारतीय जनता पार्टीच्या उमेदवार मानसी मोहिते विरुद्ध शिवसेनेचे शिंदे गटाचे उमेदवार ज्योती रमेश नागावकर यांच्यात लढत अपेक्षित मानली जात आहे.भारतीय जनता पार्टीने कोर्लई जिल्हा परिषद जागा निवडून आणण्यासाठी खूप मेहनत व निवडणुकीचे उत्कृष्ट तंत्र वापरल्यामुळे या निवडणुकीत एक आगळा वेगळा निकाल पहावयास मिळणार आहे. भारतीय जनता पार्टीचे दक्षिण रायगड जिल्हा प्रमुख ॲड.महेश मोहिते यांनी विशेष मेहनत घेतली आहे.हे मतदान सुरळीत पार पाडण्यासाठी मुरुड पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक परशुराम कांबळे यांनी ६ पोलिस अधिकारी,६० पोलिस व ८० होमगार्ड बंदोबस्त ठेवण्यात आले आहे.

## कोकण परिक्षेत्र पोलीस महानिरीक्षकांची मतदान केंद्रास भेट

**चौक : प्रतिनिधी**

कोकण परिक्षेत्र विशेष पोलीस महानिरीक्षक संजय दराडे यांनी खालापूर तालुक्यातील चौक व सावरोली या मतदान केंद्रास भेट देऊन कायदा व सुव्यवस्था याची पाहणी केली.

जिल्हा परिषद व पंचायत समिती साठी आज मतदान सुरू झाले आहे. आज सकाळी ७.३० वाजता मतदानास सुरुवात झाली. जिल्हा परिषद व पंचायत पंचायत समिती च्या निवडणुका संदर्भात कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी व त्याची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी कोकण परिक्षेत्र विशेष पोलीस महानिरीक्षक संजय दराडे यांनी आज खालापूर तालुक्यातील चौक व सावरोली मतदान केंद्रास प्रत्यक्ष भेट देऊन मतदान केंद्राची पाहणी केली.



या वेळी त्यांच्या सोबत उप विभागीय पोलीस अधिकारी डॉ. विशाल नेहुल, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार, चौक प्रभारी विशाल पवार उपस्थित होते.

चौक मतदान केंद्र हे खालापूर तालुक्यातील सर्वात मोठे मतदान केंद्र आहे.एकाच शाळा केंद्रात चार मतदान केंद्र आहे.

चौक येथील दगडी शाळेत एकूण चार मतदान केंद्र आहेत, चौक मतदान केंद्राची पाहणी केल्यावर त्यांनी चौक दूर क्षेत्र येथे भेट देऊन तेथील कार्यालयाची पाहणी करून सूचना केल्या व परिसरातील मतदान केंद्राची, परिसराची माहिती घेतली. चौक नंतर सावरोली येथेही भेट देऊन सावरोली मतदान केंद्राची पाहणी केली. यावेळी पोलीस बंदोबस्त बाबत त्यांनी समाधान व्यक्त केले.

## नागोठण्यात सकाळच्या सत्रात मतदानास अल्प, तर दुपारनंतर उत्स्फूर्त प्रतिसाद

**नागोठणे : बातमीदार**

रायगड जिल्हापरिषदेच्या पंचवार्षिक सार्वत्रिक निवडणुकीत ३९ नागोठणे गटाच्या आणि रोहा पंचायत समितीच्या ७७ नागोठणे गण व ७८ सुकेळी गणाच्या निवडणूक मतदान प्रक्रियेत नागोठणे शहर व विभागात सकाळपासून शांततेत मतदान सुरू झाले.

रायगड जिल्हा परिषदेच्या नागोठणे शहरातील १३ तसेच नागोठणे ग्रामीण विभागातील २९ मतदान केंद्रांवर सकाळी मतदान प्रक्रिया शांततेत सुरू झाली. नागोठणे शहरातील तेरा मतदान केंद्रांमध्ये कचेरी शाळेतील चार मतदान केंद्र, राजिप कन्या शाळेतील तीन मतदान केंद्र, नागोठणे एज्युकेशन सोसायटीच्या उर्दू हायस्कूल मध्ये तीन मतदान केंद्र तसेच कोळीवाडा येथील राजिप उर्दू शाळेतील तीन मतदान केंद्रांमध्ये प्रक्रिया झाली.

मतदान प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी नागोठणे पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सचिन कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस व होमगार्ड यांच्याकडून बंदोबस्त ठेवण्यात आला.

**पाहिजेत**

**डॉक्टर कुटुंबाच्या घरी पनवेल शहरात घर कामा करता जोडपे हवे आहे. राहण्याची स्वतंत्र खोली मिळेल.**

**संपर्क : ९९३०४५१६९४**

# नवी मुंबईत कचऱ्यापासून वीजनिर्मिती प्रकल्प

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबईसारख्या स्मार्ट सिटीची ओळख ही स्मार्ट सिटीसारखी प्रत्यक्षात दिसण्याकरिता सतत प्रयत्न करणाऱ्या नवी मुंबईच्या बेलापूर विधानसभेच्या आमदार मंदा म्हात्रे यांनी नवी मुंबई सारख्या महानगरपालिकेचा स्वतः चा असा कचऱ्यापासून निर्माण होणारा विजनिर्मिती प्रकल्प असावा असे ध्येय समोर ठेऊन अनेक वर्ष काम करत होत्या त्यानुसार त्यांनी २५/०७/२०२५ रोजी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना या संदर्भात पत्र दिलेले होते.

पत्रामध्ये नवी मुंबईतील झपाट्याने वाढणारी लोकसंख्या आणि त्यानुसार वाढणारा घरगुती व औद्योगिक कचऱ्याच्या समस्येच्या पार्श्वभुमीवर तुर्भे येथे कचऱ्यापासुन वीज निर्मीती प्रकल्प (Waste-to-Energy Plant) उभारण्याबाबतची मागणी केले होती. त्यानुसार विषयांकित कामाबाबत




मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांनी दि.११/११/२०२५ रोजी डॉ. रवींद्र भराटे साहेब,अवर मुख्य सचिव, नगरविकास – २ यांना या बाबत प्रस्ताव देण्याचे निर्देश दिले होते त्या अनुषंगाने डॉ.रवींद्र भराटे साहेब,अवर मुख्य सचिव, नगरविकास –२ यांनी दि. २५/११/२०२५ रोजी डॉ. कैलास शिंदे, आयुक्त नवी मुंबई महानगरपालिका यांना सदर प्रकल्पबाबत सविस्तर प्रस्ताव स्वयंस्पष्ट अभिप्राय व आवश्यक कागदपत्रांसोबत सादर करण्याचे निर्देश दिले होते.

प्रकरणाचा सतत पाठपुरवठा करून अखेर दि.०५/१२/२०२५ रोजी नवी मुंबई क्षेत्रात निर्माण होणाऱ्या घनकचरा व्यवस्थापनासाठी व विल्हेवाटीसाठी घनकचरा व्यवस्थापन अधिनियम २०१६ अन्वये एकात्मीक प्रकल्प सार्वजनिक खासगी भागीदारी (PPP) तत्वावर विकसित करणे या कामाचे Letter of Award (LO-) M/s RB Greentech LLP यांना देण्यात आले असुन सदर कामाची संक्षिप्त टिप्पणी, प्रशासकीय मंजुरी आदेश, LOA देण्यात आला. त्याची अधिकृत माहिती डॉ. कैलास शिंदे, आयुक्त नवी मुंबई महानगरपालिका यांनी दि. ३०/१२/२०२५ रोजी डॉ. रवींद्र भराटे साहेब, अवर मुख्य सचिव, नगरविकास –२ यांना सुपूर्त केली. लवकरच नवी मुंबई क्षेत्रात निर्माण होणाऱ्या घनकचरा व्यवस्थापनासाठी व विल्हेवाटीसाठी घनकचरा व्यवस्थापन अधिनियम २०१६ अन्वये एकात्मीक प्रकल्प सार्वजनिक खाजगी लोकसहभागातून (PPP) तत्वावर सुरू केला जाणार असल्याची माहिती आमदार मंदा म्हात्रे यांनी दिली.

**स्मार्ट सिटीच्या दृष्टीने पाऊल**

प्रकल्प उभारण्याकरिता अंदाजित रक्कम रु. १८०० ते रु. २००० कोटी येणार असल्याचे आमदार मंदा म्हात्रे यांनी पत्रकार परिषेदेत सांगितले. प्रकल्प नवी मुंबईच्या नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने आणि स्मार्ट सिटीच्या दृष्टीने महत्वाचा ठरणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या वेळी आमदार मंदा म्हात्रे यांच्या समवेत नवी मुंबईतील विविध सामाजिक क्षेत्रात कार्य केलेले आर. बी. बर्वे, भरत गोलतकर, निखिल भंडारी, प्रवीणकुमार देशमुख, मधुकर कोळगे, विनायक तलाठी, श्रीकांत पत्की, माजी नगरसेवक निलेश म्हात्रे, विकास सोरटे, मंगेश चव्हाण, जयंत पाटील, मालती सोनी, संजय ओबेरॉय, आरती राऊळ, किरण वर्मा, शीतल जगदाळे तसेच असंख्य पत्रकार बांधव उपस्थित होते.

## शिरवणेत धोकादायक तारा काढण्यास सुरुवात

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईत महावितरणच्या जुनाट विद्युत तारा अद्याप नवी मुंबईतील गावठाण भागात पाहायला मिळतात. या तारा अगदी नागरिकांपासून काही अंतरावर असल्याने अनेकदा शॉक लागून दुर्घटना घडण्याची शक्यता असते. इमारतींच्या खिडक्या, बाल्कनीच्या जवळ आल्याचे पाहायला मिळतात. शॉर्ट सर्किट होण्याची शक्यता वाढलेली आहे.

अशात शिरवणे गावातील भाजपच्या नवनिर्वाचित नगरसेविका माधुरी सुतार यांनी पाहणी केली. या पाहणीत सुतार यांना अनेक उघड्यावर लोंबकळणाऱ्या जिवंत विद्युत तारा आढळून आल्या. त्याबाबत नागरिकांच्या तक्रारी सुतार यांना प्राप्त झाल्या होत्या. त्यानुसार महावितरण विभागाशी संपर्क साधून या लोंबकळणाऱ्या जिवंत



विद्युत तारा काढून टाकण्यास, भूमिगत करण्यास शुक्रवारपासून सुरुवात झाली.

यानुसार या विद्युत तारा भूमिगत करण्यात येणार आहेत. त्यामुळे नागरिकांना जिवंत विद्युत तारांपासून सुरक्षितता मिळणार असल्याचे माधुरी सुतार यांनी सांगितले. तसेच लवकरच विद्युत डीपी आणि आवश्यकतेनुसार नवीन पोल लावण्यास सुरुवात होणार ऐकायचे सुतार म्हणाल्या.

## सामान्य नागरिकांची निवेदने स्वीकारा; उपमहापौर दशरथ भगत यांचे निर्देश



**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिकेचा उपमहापौर म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर उपमहापौर दशरथ भगत यांनी पहिल्याच दिवशी नागरिक केंद्रित कार्यपद्धतीला प्राधान्य देत कामकाजाची नव्याने सुरुवात करत सामान्य नागरिकांची निवेदने स्वीकारीत संबंधित विभागांना तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

पदभार स्वीकारताच शहरातील विविध भागांतून आलेल्या नागरिकांशी प्रत्यक्ष संवाद साधून त्यांच्या समस्या, तक्रारी व नागरी सुविधांबाबतच्या अपेक्षा जाणून घेतल्या. नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित प्रश्नांना संवेदनशीलतेने समजून घेऊन, त्यावर तातडीने व परिणामकारक कार्यवाही होण्याच्या दृष्टीने संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना व मार्गदर्शन देखील दिले.

लोकप्रतिनिधी म्हणून जनतेशी थेट संपर्क, पारदर्शक निर्णय प्रक्रिया आणि वेळेत समस्या निवारण हीच माझ्या कार्यपद्धतीची प्रमुख सूत्रे राहतील. नवी मुंबई शहराच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच नागरिकांना अधिक सक्षम, सुरक्षित व सोयीस्कर नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रामाणिकपणे आणि जबाबदारीने कार्य करण्याचा माझा संकल्प राहील अशी भावना उपमहापौर दशरथ भगत यांनी यावेळी बोलतांना व्यक्त केली.

## नवी मुंबई महापालिकेला हरित ऊर्जा आणि ऊर्जा कार्यक्षमता पुरस्कार

**नवी मुंबई : बातमीदार**

विविध राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी मानांकित असणाऱ्या नवी मुंबई महानगरपालिकेस पथदिवे (स्ट्रीट लाईटींग) आणि इव्ही चार्जींग स्टेशन्स या दोन उपक्रमांकरिता हरित ऊर्जा आणि ऊर्जा कार्यक्षमता या क्षेत्रातील कामगिरीबद्दल देण्यात येणारा राष्ट्रीय उत्कृष्टता सुवर्ण पुरस्कार प्राप्त झालेला आहे.

विशेष म्हणजे एकाच वेळी दोन उपक्रमांकरिता हरित ऊर्जा आणि ऊर्जा कार्यक्षमता राष्ट्रीय उत्कृष्टता सुवर्ण पुरस्कार प्राप्त करणारी नवी मुंबई ही देशातील एकमेव शहरी स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून मानांकित झाली.

दिल्ली येथे ४ फेब्रुवारी रोजी संपन्न झालेल्या विशेष पुरस्कार सोहळ्यात नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता प्रवीण गाडे यांनी हे प्रतिष्ठेचे पुरस्कार स्विकारले.



या वेळी उपअभियंता संतोष मोरासकर उपस्थित होते.

पुरस्काराबद्दल महापौर सुजाता पाटील, उपमहापौर दशरथ भगत तसेच आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी आनंद व्यक्त करीत समस्त नवी मुंबईकर नागरिकांचे अभिनंदन केले आहे.

इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स आणि डेलोईट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित चौदावा ग्रीन एनर्जी समिट व सहावा ग्रीन ऊर्जा व ऊर्जा कार्यक्षमता पुरस्कार सोहळा ४ फेब्रुवारी रोजी ले मेरिडिअन, नवी दिल्ली येथे डिझायर सभागृहात झाला.

पुरस्कारांचे मूल्यांकन हे अत्यंत शिस्तबध्द पध्दतीने काटेकोर आणि पारदर्शक प्रक्रियेव्दारे करण्यात आले.

नवी मुंबई महानगरपालिकेची ऊर्जा कार्यक्षम एलईडी स्ट्रीट लाईटींग, सौरउर्जे वरील स्ट्रीट लाईटींग व्यवस्था या उपक्रमास एक राष्ट्रीय उत्कृष्टता सुवर्ण पुरस्कार आणि इलेक्ट्रिक वाहन चार्जींग पायाभूत सुविधांच्या अंमलबजावणीसाठी एक राष्ट्रीय उत्कृष्टता सुवर्ण पुरस्कार प्रदान करण्यात आला. अशाप्रकारे हरित ऊर्जा आणि ऊर्जा कार्यक्षमता या क्षेत्रातील दोन सुवर्ण पुरस्कार पटकाविणारी नवी मुंबई महानगरपालिका ही देशातील एकमेव शहरी स्थानिक स्वराज्य संस्था आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेला राष्ट्रीय स्तरावर दोन पुरस्कारांचा लाभलेला हा बहुमान नवी मुंबई महानगरपालिकेच्या नागरिक–केंद्रित धोरणांचा, परस्पर समन्वयाचा आणि हरित भविष्याकडे वाटचाल करण्याच्या दृढ संकल्पाचे द्योतक आहे. नवी मुंबई महानगरपालिकेची वाटचाल नियोजित शहराकडून आता प्लॅनेट पॉझिटिव्ह सिटीकडे समर्थपणे होत आहे.

## चुकीच्या कामांची चौकशी करण्यात येईल -संजीव नाईक

**नवी मुंबई : बातमीदार**

प्रशासनाची हुमूकशाही आता संपुष्टात आली असून, गेल्या सहा वर्षात प्रशासनाच्या माध्यमातून झालेल्या चुकीच्या कामांची चौकशी करण्यात येईल आणि याला जबाबदार असलेल्या व्यक्तींवर कायदेशीर कारवाई करत गुन्हा दाखल केला जाईल. सभागृहाच्या माध्यमातून हा निर्णय होईल, असा थेट इशारा डॉ. संजीव नाईक यांनी दिला आहे.



गुरुवारी नवी मुंबईच्या महापौर–उपमहापौर पदावर भाजपचे उमेदवार बिनविरोध विराजमान झाल्यावर डॉ. संजीव नाईक यांनी प्रशासकांच्या कारभराविरोधात आक्रमक पवित्रा घेतल्याचे पाहायला मिळाले. विशेष महासभेत महापौरांची निवड झाल्यानंतर भाजपचे नवी मुंबई प्रभारी आणि माजी खासदार डॉ. संजीव नाईक यांनी प्रशासन आणि प्रशासनाच्या माध्यमातून गैरकरभार करणाऱ्यांना इशारा दिला.

गेली सहा वर्ष नवी मुंबईत लोकशाही नव्हती तर प्रशासनाच्या माध्यमातून हुकुमशाही होती मात्र ती हुकुमशाही आता महापौर बसल्यावर संपुष्टात आली असल्याचे डॉ. संजीव नाईक यांनी म्हटले.

नवी मुंबईच्या जनतेला आपल्या कररूपी पैशांचा अपव्यय झाल्याचे वाटते आहे. त्या सर्व चुकीच्या गोष्टींची श्वेतपत्रिका काढून गेल्या सहा वर्षांच्या कारभाराची इत्यंभूत चौकशी केली जाईल. यात जे दोषी आढळतील त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करत गुन्हा दाखल करण्याचा निर्णय सभागृहात घेतला जाईल असा गंभीर इशारा डॉ. संजीव नाईक यांनी यानिमित्ताने दिला आहे.



### महापौर, उपमहापौर यांचे आयुक्तांकडून अभिनंदन

**नवी मुंबई : बातमीदार**

महापौर व उपमहापौर निवडणूकीनंतर आज महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी सर्व विभागप्रमुख व अधिकारी यांच्यासह महापौर सुजाता पाटील व उपमहापौर दशरथ भगत यांची भेट घेत पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.

या वेळी सर्व अधिकाऱ्यांनी ओळख करून दिली व आपल्याकडे असलेल्या विभागांची दिली. या वेळी विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. लोकप्रतिनिधी आणि प्रशासन यांनी परस्पर समन्वयाने नागरिकांना अपेक्षित असलेले शहर विकासाचे काम करुया असे महापौर सुजाता पाटील यांनी प्रतिपादन केले.

## कामोठे येथे भव्य तिरंगा बाईक रॅली

**पनवेल : वार्ताहर**

मावळा ब्रिगेड (नवी मुंबई) व क्रिकेट प्रेमी ग्रुप कामोठे नवी मुंबई यांच्या संयुक्त विध्यमानाने भव्य तिरंगा बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी मावळा ब्रिगेड चे हितचिंतक पनवेल महानगरपालिका नगरसेवक विकास घरत, व्यापारी संघटना कामोठे अध्यक्ष नाना मगदूम, राजमाता अहिल्यादेवी सेवा संस्था कामोठे अध्यक्ष रावसाहेब बुधे, तसेच मावळा ब्रिगेडचे मार्गदर्शक गणेशशेठ बेरगळ, ॲड. रवी कदम, सल्लागार पवनकुमार बेरगळ, पांडुरंग यमगर, सुशांत काटकर, कैलाश सरगर, ॲड. कपिल शेठे, विष्णू कारंडे, जेष्ठ नागरिक राजाराम पाटील यांच्या प्रमुख



उपस्थिति मधे पार पडली. त्याच बरोबर स्थानिक कामोठे पोलीस स्टेशन आयोजित सायबर क्राईम जनजागृती मोहिमेमध्ये सहभागी झालो. यावेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक विमल बिडवे व त्यांच्या सहकाऱ्यांनी मार्गदर्शन केले.

रॅलीदरम्यान क्रिकेट प्रेमी ग्रुप चे, प्रथमेश दुधे, रुपेश उंडे, देवा गुट्टकडे, सचिन गोरड, रवी कारंडे, ब्रम्हा कारंडे, विजय सरगर, गणेश शिंदे, नितेश वाजे व असंख्य सहकारी उपस्थित होते. या रॅली दरम्यान विभागातील सामाजिक संस्था, स्थानिक सोसायटी मधील रहिवाशी सामील झाले होते. अशी माहिती मावळा ब्रिगेडचे संस्थापक अध्यक्ष संदिप वावरे यांनी दिली, तसेच येणाऱ्या काळात संस्थेच्या माध्यमातून अनेक सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार आहेत अशी माहिती सेक्रेटरी लक्ष्मण कारंडे, खजिनदार महेंद्र हिरे आणि कार्याध्यक्ष दिनेश निलख यांनी दिली.

आजपर्यंतच्या संस्थेच्या वाटचालीबद्दलची माहिती योगेश निलख (उपाध्यक्ष), संदिप साळुंखे (उपसेक्रेटरी), सचिन शेंबडे (उपखजिनदार) व रोहीत कोळेकर यांनी दिली. या वेळी मावळा ब्रिगेडचे सर्व शिलेदार उपस्थित होते.

## हिंद-दी-चादर शहिदी समागम कार्यक्रमासाठी प्रशासन सज्ज

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त आयोजित 'हिंद दी चादर' या कार्यक्रमाच्या पूर्वतयारीचा विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी आज सविस्तर आढावा घेतला. या ऐतिहासिक व प्रेरणादायी कार्यक्रमाच्या आयोजनात कोणत्याही त्रुटी राहू नयेत, यासाठी प्रशासनाने दक्षतेने व समन्वयाने काम करावे, असे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

कोकण विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित आढावा बैठकीला रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे, अपर आयुक्त फरोग मुकादम, उपायुक्त विजय म्हसाळ, पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त मंगेश चितळे, पोलीस उपायुक्त प्रशांत मोहिते, रश्मी करंदीकर, नियोजन उपायुक्त प्रमोद केंभावी, या कार्यक्रमाचे राज्य समन्वयक उपजिल्हाधिकारी (रोहयो) रविंद्र राठोड यांच्यासह कोकण विभागातील महसूल, शिक्षण, आरोग्य, महानगरपालिका, पोलीस विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. जेएनपीए आणि सिडकोचे अधिकारी दूरदृष्यप्रणालीव्दारे या बैठकीस उपस्थित होते.



आढावा बैठकीत कार्यक्रमाची एकूण रूपरेषा, जनजागृती, प्रभात फेऱ्या, विद्यार्थी व युवकांचा सहभाग, मुख्य सोहळ्याचे नियोजन तसेच कायदा–सुव्यवस्था, वाहतूक, सुरक्षा, स्वच्छता व आरोग्य सुविधांबाबत सविस्तर चर्चा झाली.

हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त खारघर, नवी मुंबई येथे २८ फेब्रुवारी व १ मार्च रोजी भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, या ऐतिहासिक सोहळ्याच्या यशस्वीततेसाठी जिल्हा प्रशासनाने व्यापक तयारी सुरू केली आहे. कार्यक्रमाच्या सुयोग्य नियोजनासाठी शासकीय अधिकारी, गुरुद्वारा प्रशासन तसेच विविध समाजघटकांच्या सहभागातून तब्बल २५ समित्यांची स्थापना करण्यात आली आहे.

कार्यक्रमाच्या माध्यमातून श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांचा त्याग, शौर्याचा संदेश समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहचवावा, असे आवाहन आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांनी यावेळी केले. नागपूर व नांदेड येथे हा समागम यशस्वीरित्या पार पडला असून, खारघर येथे होणाऱ्या या ऐतिहासिक कार्यक्रमासाठीही अत्यंत शिस्तबद्ध आणि सूक्ष्म नियोजन करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. नागरिकांना कोणतीही गैरसोय होणार नाही, याची विशेष काळजी घेऊन कार्यक्रम शिस्तबद्ध, शांततापूर्ण व उत्साहात पार पाडावा यासाठी सूक्ष्म नियोजन करावे. तसेच सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वय ठेवून जबाबदारीने काम करावे, प्रत्येक विभागाने प्रचार व प्रसाराचे नियोजन करावे, असे निर्देशही त्यांनी सर्व यंत्रणांना दिले. 'हिंद दी चादर' कार्यक्रमाच्या माध्यमातून सामाजिक ऐक्य, सद्भावना व ऐतिहासिक मूल्यांची जाणीव निर्माण होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी हिंद दी चादर कार्यक्रमाच्या अनुषंगाने केलेल्या तयारीबाबत सविस्तर माहिती दिली. या कार्यक्रमासाठी नवी मुंबईसह मुंबई, पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदूर्ग जिल्ह्यासह राज्यभरातून तसेच परदेशातूनही मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर सुरक्षा, वाहतूक, वैद्यकीय सेवा, स्वच्छता, भोजन, निवास, प्रसिद्धी, जलपुरवठा, विद्युत व्यवस्था आदी सर्व बाबींसाठी स्वतंत्र समित्या स्थापन करण्यात आल्या असून त्यानुषंगाने प्रशासनाव्दारे सर्वंकष तयारी करण्यात येत आहे.

## खारघर येथील इज किड्स शाळेचा वर्धापन दिन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी त्यांच्या हक्काचे व्यासपीठ म्हणजे वार्षिक स्नेहसंमेलन मेळावा. खारघर येथील इज किड्सच्या शाळेचा आशिया वार्षिक वर्धापन दिन खारघर येथील रामशेठ ठाकूर कॉलेज ऑफ सायन्सच्या मैदानात पार पडला.

शिक्षक पालक आणि विद्यार्थ्यांच्या एकत्रित सहभागामुळे या कार्यक्रमांमध्ये रंगत आली. शाळेचा यंदाचा हा आठवा वार्षिक स्नेहसंमेलन मेळावा असून यंदा ९० मुलांनी यात भाग घेतला होता. व्यासपीठावरील मुलांच्या मस्तीने




पालक आणि शिक्षकांनीही या कार्यक्रमाचा आनंद लुटला. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित विद्यार्थ्यांचा गुणगौरव व पारितोषिक देण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने झाली. यावेळी शाळेच्या संस्थापिका अपर्णा पटेल, रजनीकांत पटेल, शिक्षक, विद्यार्थी आणि विद्यार्थी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका दर्शा पटेल यांनी केले.

## इमॅन्युएल इंटरनॅशनल स्कूलचा वार्षिक दिन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील मोरबे येथे इमॅन्युएल इंटरनॅशनल स्कूल दुसरा वार्षिक दिन उत्सवात साजरा करण्यात आला कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इमॅन्युएल इंटरनॅशनलडमीचे चेअरमन फादर सिनु मैथु आणि प्राचार्य मल्लिका सि न्यू उपस्थित होते.

प्रमुख पाहुण्यांमध्ये लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सहाय्यक आयुक्त संदीप गायकवाड, ज्येष्ठ पत्रकार माधव पाटील, माजी उपसरपंच धनंजय पाटील, रेव्हरेड जोबी थॉमस, रवी पाटील यांचा समावेश होता.

विद्यार्थ्यांना नृत्य संगीत आणि नाट्यकला सादर करून कार्यक्रमात रंगत विद्यार्थ्यांना शिक्षकांना बक्षीस देऊन गौरविण्यात आले होते.

# श्रीवर्धनमध्ये मद्यधुंद पर्यटकांची बेफिकिरी

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन तालुक्यात गेल्या दोन वर्षांपासून पर्यटकांच्या वाहन अपघातांचे प्रमाण सातत्याने वाढताना दिसत असून, किरकोळ धडका ते जीवघेणे अपघात अशी चिंताजनक मालिका थांबण्याचे नाव घेत नाही. या अपघातांचा सखोल आढावा घेतल्यास बहुतांश घटनांमध्ये चालक मद्यधुंद अवस्थेत असल्याचे निष्पन्न होत आहे, ही बाब अधिक गंभीर आहे.

हरिहरेश्वर येथे होम-स्टेच्या खोलीभाड्यावरून झालेल्या वादातून पर्यटक चालकाने मालकाच्या बहिणीस चारचाकी वाहनाखाली चिरडल्याची घटना, श्रीवर्धन शहरात अल्पवयीन चालकाने थार वाहनाने दुचाकीस्वारास उडवल्याची घटना, तसेच दिवेआगर येथे चारचाकी वाहनाने दुचाकीला धडक देत चालकाला फरफटत



## अपघातांची साखळी चिंताजनक

नेल्याने झालेला दुर्दैवी मृत्यू - या तिन्ही प्रकरणांमध्ये वाहन चालक मद्यधुंद अवस्थेत असल्याची बाब तपासात पुढे आली आहे. पोलीस कारवाई तत्पुरती ठरतेय?

हरिहरेश्वर दुर्घटनेनंतर काही काळ श्रीवर्धन तालुक्यातील महत्त्वाच्या ठिकाणी पोलीस विभागाकडून चेकपोस्ट उभारून पर्यटक वाहनांची तपासणी करण्यात आली होती. मद्यपान करून वाहन चालवणाऱ्यांवर कारवाईही झाली, मात्र ही मोहीम अल्पकालीन ठरल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे.

दरम्यान, तालुक्यातील पर्यटन व्यवसायाशी संबंधित एक गंभीर बाब चर्चेत आली आहे. काही ठिकाणी आलेल्या पर्यटकांना नियमबाह्य पद्धतीने मद्यपानाची व्यवस्था उपलब्ध करून दिली जात असल्याची माहिती समोर येत आहे.

स्थानिक पर्यटन व्यावसायिक बहुतांशी शासनाने ठरवून दिलेल्या नियमावलीनुसार व्यवसाय करत असले, तरी मुंबई व पुण्यासारख्या महानगरांतील काही धनाढ्य गुंतवणूकदारांनी तालुक्यात रिसॉर्ट, होम-स्टे व रेस्टॉरंट व्यवसाय सुरू करून प्रत्यक्ष व्यवस्थापन 'केअर टेकर'कडे सोपवले असल्याचे वास्तव आहे. या केअर टेकरमार्फतच पर्यटकांना मद्यपुरवठा होत असल्याच्या चर्चा सुरू आहेत.

श्रीवर्धनमधील थार अपघात प्रकरणात अल्पवयीन तरुण सलग दोन दिवस संबंधित रेस्टॉरंट परिसरात मद्यपान करून अर्वाच्य शिवीगाळ व गोंधळ घालत असल्याची माहिती स्थानिकांनी दिली होती. ही बाब केअर टेकरच्या निदर्शनास आणून दिल्यानंतरही दुर्लक्ष करण्यात आले, असा आरोप स्थानिक नागरिकांकडून केला जात आहे.

मोटार वाहन अधिनियम, बाल न्याय कायदा, तसेच मद्यविक्रीसंबंधीचे राज्याचे नियम पाहता मद्यधुंद अवस्थेत वाहन चालवणे, अल्पवयीनांना मद्य उपलब्ध करून देणे, परवान्याविना मद्यपुरवठा करणे हे गंभीर गुन्हे ठरतात. पर्यटनाच्या नावाखाली तालुक्याची सुरक्षितता धोक्यात येत असेल, तर केवळ चालकांवरच नव्हे, तर मद्यपुरवठ्यास जबाबदार असणाऱ्या घटकांवरही कठोर कारवाई होणे आवश्यक असल्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

### तालुक्याची बदनामी

***पर्यटन आणि सुरक्षिततेचा समतोल हवा पर्यटन विकासाला विरोध नसून, तो कायदेशीर व सुरक्षित पद्धतीने व्हावा, हीच स्थानिकांची अपेक्षा आहे. अन्यथा, काही बेफिकीर पर्यटक व निष्काळजी व्यवस्थापनामुळे संपूर्ण तालुक्याची बदनामी होत असून, निरपराध नागरिकांचे जीव धोक्यात येत आहेत.***

# पशुपालकांना मोठा दिलासा

## वीज बिलाच्या टेन्शनमधून सुटका

**पाली : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील पशुपालकांसाठी राज्य सरकारने एक अत्यंत दिलासादायक निर्णय घेतला आहे. पशुपालन व्यवसायाला आता 'कृषी'चा दर्जा देण्यात आला असून, यामुळे जिल्ह्यातील हजारो पशुपालकांना आता व्यावसायिक दराऐवजी सवलतीच्या कृषी दराने वीज उपलब्ध होणार आहे. या निर्णयामुळे पशुपालकांचा उत्पादन खर्च कमी होऊन ग्रामीण अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

पशुसंवर्धनाशी संबंधित व्यवसायांसाठी आतापर्यंत 'कृषी इतर' या वर्गवारीनुसार वीज बिल आकारले जात होते. मात्र, आता नवीन निर्णयानुसार ही आकारणी थेट कृषी वर्गवारीप्रमाणे केली जाईल. तसेच, कुक्कुटपालन आणि इतर पशुसंवर्धन प्रकल्पांसाठी



**शासनाच्या या निर्णयामुळे रायगड जिल्ह्यातील पशुपालकांसाठी एक सुवर्णसंधी निर्माण झाली आहे. वीज बिलात मिळणाऱ्या सवलतीमुळे पशुपालकांचा दैनंदिन उत्पादन खर्च मोठ्या प्रमाणात कमी होईल. यासोबतच यांत्रिकीकरणावर भर देणे अधिक सोपे होईल. जिल्ह्यातील अधिकाधिक पशुपालकांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी आपली नोंदणी पूर्ण करावी.**

**-डॉ. सचिन देशपांडे, जिल्हा उपायुक्त, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय, रायगड**

सोलर पंप व इतर सौर ऊर्जा संच उभारण्यासाठी सुद्धा कृषी व्यवसायाप्रमाणेच अनुदान आणि सवलत दिली जाणार आहे. या निर्णयामुळे केवळ वीज बिलातच बचत होणार नाही, तर कृषी व्यवसायाप्रमाणेच पशुपालन व्यवसायाला सुद्धा बँकांकडून मिळणाऱ्या कर्जावरील व्याजदरात सवलत मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

### कोणाला मिळणार या योजनेचा लाभ?

या सवलतीसाठी शासनाने काही निकष निश्चित केले आहेत:; कुक्कुटपालन: २५ हजार किंवा त्यापेक्षा कमी मांसल पक्षी / ५० हजार किंवा त्यापेक्षा कमी अंडी उत्पादक पक्षी, हॅचरी युनिट: ४५ हजार किंवा त्यापेक्षा कमी क्षमता, दुग्ध व्यवसाय: १०० किंवा त्यापेक्षा कमी दुभत्या जनावरांचा गोठा, शेळी-मेंढी पालन: ५०० किंवा त्यापेक्षा कमी मेंढी/शेळी असलेला गोठा, वराह पालन: २०० किंवा त्यापेक्षा कमी वराह.

### आवश्यक पात्रता

पशुपालकांनी जिल्हा उपायुक्तांकडे नोंदणी करणे बंधनकारक आहे. पशुधनाची एनडीएलएम (भारत पशुधन) पोर्टलवर नोंदणी असणे आवश्यक. पशुपालन प्रकल्पासाठी स्वतंत्र वीज मीटर असावे. अवसायनातील (बंद पडलेल्या) सहकारी संस्था किंवा प्रकल्प या सवलतीस पात्र ठरणार नाहीत.

### असा करा अर्ज

नवीन पशुपालकांनी वीज मीटर जोडणीसाठी महावितरण (MSEDCL) च्या संबंधित उपअभियंता कार्यालयात ऑनलाईन किंवा ऑफलाईन पद्धतीने अर्ज करावा. अर्जाची एक प्रत संबंधित तालुक्याच्या सहाय्यक आयुक्त (पशुसंवर्धन) कार्यालयात जमा करणे आवश्यक आहे. तांत्रिक अडचणी सोडवण्यासाठी तालुका स्तरावर सहाय्यक आयुक्त व महावितरणचे उपअभियंता, तर जिल्हा स्तरावर जिल्हा उपायुक्त कार्यालय व महावितरणचे कार्यकारी अभियंता समन्वय पाहतील.

### महत्त्वाचे नियम व अटी

पशुपालकांनी वेळोवेळी बदलणाऱ्या निकषांची पूर्तता करणे बंधनकारक राहील. या योजनेत जर कोणताही अनधिकृत वीजवापर आढळला, तर विद्युत अधिनियम २००३ (कलम १२६ व १३५) नुसार महावितरणमार्फत कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल.

# माणगाव येथे दिव्यांग तपासणी शिबिर

**माणगाव : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील माणगाव येथे भारत विकास परिषद संचलित दिव्यांग पुनर्वसन केंद्र, पुणे (ट्रस्ट - नव भारत विकास फाउंडेशन) यांच्या वतीने मोफत दिव्यांग शिबिर यशस्वीरीत्या झाले.

या शिबिरामध्ये कृत्रिम मॉड्युलर पाय, हात व कॅलिपर बसविण्यासाठी दिव्यांगांची तपासणी करण्यात आली. एकूण १२३ दिव्यांग लाभार्थ्यांनी या शिबिराचा लाभ घेतला. शिबिराचे आयोजन रोटरी क्लब ऑफ पुणे, भारत विकास परिषद तसेच स्थानिक स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने करण्यात आले होते.



शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी दिव्यांग व वृद्धत्व केंद्रप्रमुख विनय खुटवळकर (पुणे) यांनी उपस्थित दिव्यांगांना आधुनिक कृत्रिम अवयवांबाबत सविस्तर माहिती दिली. तसेच भविष्यात पात्र दिव्यांगांना कृत्रिम पाय व हात मोफत बसविण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.

या उपक्रमासाठी रोटरी क्लब ऑफ पुणेचे प्रोजेक्ट कोऑर्डिनेटर आर्या पवार यांनी मार्गदर्शन केले. दिव्यांग बांधवांनी आवश्यक अर्ज करून या आधुनिक साधनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले. या शिबिराला माणगाव तालुक्यातील विविध स्वयंसेवी संस्था, कार्यकर्ते व नागरिकांची उपस्थिती लाभली. दिव्यांगांच्या जीवनात आत्मनिर्भरता व आत्मविश्वास निर्माण करणारा हा उपक्रम असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

# नियम मोडणाऱ्या वाहनांवर कारवाई

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

जिल्ह्यात वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करून बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्या वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे.

रायगड जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत असणारे वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी शुक्रवारी (दि.६) वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण ३८ व्यक्तींवर कायदेशीर कारवाई केली. विविध वाहतूकीचे नियम भंग केल्याप्रकरणी त्यांच्याकडून ३८, हजार ५०० रुपये इतका दंड आकारला आहे.

# अलिबाग येथे ई-सेवा आणि नक्कल कॉपी केंद्राचे उद्घाटन



**रायगड : रामप्रहर वृत्त**

जिल्हा न्यायालय रायगड, अलिबाग येथे नागरिकांना व वकिलांना सुलभ, जलद व पारदर्शक सेवा मिळाव्यात या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या ई-सेवा व नक्कल कॉपी कार्यालयाचे उद्घाटन प्रमुख जिल्हा न्यायाधीश राजेंद्र सावंत यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

या वेळी सृष्टी नीलकंठ, जिल्हा न्यायाधीश-१, एस.आर.तिवारी, जिल्हा न्यायाधीश-२, तसेच एच. डी. भगत, जिल्हा न्यायाधीश-३, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव श्रीमती तेजस्विनी निराळे उपस्थित होते. याशिवाय जिल्हा न्यायालयातील सर्व माननीय न्यायाधीश, न्यायिक अधिकारी व कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

या कार्यक्रमाला वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड. प्रसाद पाटील, उपाध्यक्ष ॲड.ए.डी. पाटील,सचिव ॲड.अमित देशमुख यांच्यासह अनेक ज्येष्ठ व कनिष्ठ वकील, न्यायालय व्यवस्थापक महेश दायमा उपस्थित होते. ई-सेवा व नक्कल कॉपी केंद्राच्या माध्यमातून आता न्यायालयीन कागदपत्रांच्या नक्कल प्रती, अर्ज, विविध सेवा अधिक वेगाने व सुलभ पद्धतीने मिळणार असून नागरिकांचा वेळ व श्रम वाचण्यास मदत होणार आहे. डिजिटल प्रणालीमुळे कामकाजात पारदर्शकता येऊन न्यायप्रणाली अधिक सक्षम होईल असे मत जिल्हाप्रमुख न्यायाधीश राजेंद्र सावंत यांनी व्यक्त केले.

या उपक्रमामुळे न्यायालयीन कामकाज अधिक आधुनिक, गतिमान व नागरिकाभिमुख होण्यास मोठी मदत होणार असून न्याय प्रक्रियेत विश्वास वाढण्यास हातभार लागेल, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.

# रस्ता सुरक्षा स्पर्धेत तटकरे महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे यश

**माणगाव : प्रतिनिधी**

अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स, मुरुड यांच्या वतीने व लायन्स क्लब ऑफ अलिबाग यांच्या सहकार्याने आयोजित राष्ट्रीय स्तरावरील ऑनलाईन रस्ता सुरक्षा जनजागृती स्पर्धेत माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे द. ग. तटकरे महाविद्यालय, माणगाव (रायगड) येथील विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करत महाविद्यालयाच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचा गौरव वाढविला आहे.

या स्पर्धेत पथनाट्य स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावून सानिया जाधव, शाहिद मुल्ला, वैष्णवी पुजारी, श्रेयश मोरे, राज ओव्हाळ व सूरज रक्ते या विद्यार्थ्यांनी आपल्या सशक्त अभिनय, प्रभावी संवाद व सामाजिक आशयपूर्ण सादरीकरणाद्वारे परीक्षकांची मने जिंकली. तसेच भाषण स्पर्धेत प्रथम क्रमांक सीमा धनसे



हिने, तर निबंध लेखन स्पर्धेत प्रथम क्रमांक शाश्वती महाडिक हिने मिळवून महाविद्यालयाचा नावलौकिक राष्ट्रीय पातळीवर पोहोचविला. याशिवाय पोस्टर मेकिंग स्पर्धेत द्वितीय क्रमांक रुतुजा सुतार हिने पटकावून आपल्या सर्जनशीलतेची छाप उमटवली. ही सर्व यशस्वी कामगिरी महिला विकास कक्ष प्रमुख प्रा. वृषाली सलसकर, प्रा. स्वप्नील सकपाळ, प्रा. श्रावणी बक्कम तसेच सर्व समिती सदस्यांच्या मार्गदर्शनाखाली साध्य झाली. त्यांच्या प्रेरणादायी नेतृत्वामुळे विद्यार्थ्यांमध्ये रस्ता सुरक्षा विषयक सामाजिक जाणीव, जबाबदारीची भावना व कलागुणांना योग्य दिशा मिळाली.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे, संस्थेचे सर्व पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. एम. खामकर व उपप्राचार्य डॉ. आर. एम. आचार्य यांनी विजेत्या विद्यार्थ्यांचे तसेच मार्गदर्शक प्राध्यापकांचे मनःपूर्वक अभिनंदन केले व त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# डॉ. विजय कोकणे यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

**अलिबाग : प्रतिनिधी**

भारत सरकारच्या कौशल्य विकास मंत्रालयाची योजना जन शिक्षण संस्थान रायगडचे संचालक डॉ. विजय हिरामण कोकणे ह्यांच्या समाजकार्य- एक कलात्मक कौशल्य शास्त्र पुस्तकाचे प्रकाशन शुक्रवारी करण्यात आले.

जन शिक्षण संस्थान रायगड पर्यावरण पूरक व्यवसाय प्रशिक्षण केंद्र, सहाण-अलिबाग येथे आयोजित आयोजित करण्यात आलेल्या समारंभात पुस्तक प्रकाशित करण्यात आले.

या वेळी जन शिक्षण संस्थान रायगडचे अध्यक्ष डॉ. नितीन गांधी, उपाध्यक्ष रत्नप्रभा बेल्हेकर, संचालक डॉ. विजय कोकणे, व्यवस्थापक मंडळ सदस्य नरेन जाधव, ॲड. नीला तुळपुळे, गितांजली ओक, सनदी लेखापरीक्षक संजय राऊत, ह्यूमन कॅपॅसिटी डेव्हलपमेंट ट्रेनिंग सर्व्हिसेसचे संचालक हिरामण कोकणे, डॉ. आशा कोकणे, सुमन कोकणे, वेदांत कोकणे, सचिन चव्हाण, उज्ज्वला चंदनशिव, डॉ. राजाराम हुलवान, रूपेश दांडेकर, मुकुल खेबूडकर, पंडित ढमढेरे, अनिलकुमार बेल्हेकर, अरविंद कर्णिक, प्रिया कर्णिक, जयश्री ढमढेरे, विनायक देशपांडे, सुजाता देसाई, विद्या पाठारे, प्रतिक्षा चव्हाण, कल्पना म्हात्रे व अक्षता जामकर तसेच कर्मचारी उपस्थित होते. माधवी खेबूडकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

डॉ. विजय हिरामण कोकणे हे भारत सरकारच्या कौशल्य विकास मंत्रालयाची योजना जन शिक्षण संस्थान रायगड योजनेचे विद्यमान संचालक असून त्यांची वेदांत, घोडदौड, वारली चित्रकला कलात्मक पुस्तिका, कॉलेज विश्व, प्रधानमंत्री सांसद आदर्श ग्राम योजना, मला कळलेले पी.एफ.एम.एस अशी सहा पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

# रायगड विभागीय आविष्कार विज्ञान प्रदर्शन उत्साहात

**माणगाव : प्रतिनिधी**

छत्रपती शिक्षण मंडळ, कल्याण यांच्या वतीने आयोजित 'आविष्कार - कल्पकतेतून कृतीकडे' २०२५-२६ या उपक्रमांतर्गत रायगड विभागीय विज्ञान प्रदर्शन नुकतेच माध्यमिक विद्यालय रातवड, ता. माणगाव, जि. रायगड येथे उत्साहात झाले.

या विभागीय फेरीत रायगड जिल्ह्यातील पाच शाळांनी सहभाग नोंदवला. यामध्ये माध्यमिक विद्यालय रातवड, अभिनव ज्ञान मंदिर उसर खुर्द, सरस्वती विद्यालय वडघर मुद्रे,, जय जवान जय किसान विद्यालय वाघेरी तसेच गोळेगणी पंचक्रोशी माध्यमिक विद्यालय गोळेगणी या शाळांचा समावेश होता. इयत्ता ५ वी



ते ९ वी मधील एकूण २२ प्रकल्प व ४० विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनात सहभाग घेतला

विद्यार्थ्यांनी आपत्ती व्यवस्थापन, पर्यावरणीय विज्ञान, रोबोटिक्स यांसारख्या विषयांवरील नावीन्यपूर्ण व उपयुक्त प्रकल्प सादर करून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून कोलाड ज्युनिअर कॉलेजचे प्राध्यापकपाटील सर व मेहतर यांनी काम पाहिले. त्यांनी विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे कौतुक करत वैज्ञानिक दृष्टिकोनातून मार्गदर्शन केले.

ही स्पर्धा माध्यमिक विद्यालय रातवडचे मुख्याध्यापक संतोष कदम सर यांच्या मार्गदर्शनाखाली शिस्तबद्ध व यशस्वीरीत्या पार पडले.

विज्ञान विभाग शिक्षक राजेंद्र भगत व विभागातील सर्व विज्ञान शिक्षकांनी मेहनत घेऊन उत्तम असे नियोजन केले. निवड झालेले प्रकल्प पुढील अंतिम फेरीसाठी पात्र ठरले आहेत. छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण विज्ञान विभाग प्रमुख अर्पिता कानिटकर, एनइपी प्रमुख उर्मिला जाधव, संस्थेचे अध्यक्ष डॉ. नंदकिशोर जोशी, सरचिटणीस डॉ. निलेश रेवगडे यांनी सर्व सहभागी, विजयी स्पर्धकांचे अभिनंदन केले आहे.

उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन, संशोधन वृत्ती व सर्जनशीलता वृद्धिंगत होण्यास मोठी मदत होत असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

# मध्य रेल्वेच्या १२ कर्मचाऱ्यांना पुरस्कार

**रोहा : प्रतिनिधी**

मध्य रेल्वे महाव्यवस्थापक श्री प्रतीक गोस्वामी यांनी मुंबई येथील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे आयोजित कार्यक्रमात मध्य रेल्वेच्या १२ कर्मचाऱ्यांना संरक्षा पुरस्कार प्रदान करून त्यांचा सत्कार केला.

कर्तव्यावर असताना कर्मचाऱ्यांनी दाखविलेली सतर्कता, प्रसंगावधान आणि कर्तव्यनिष्ठा यामुळे संभाव्य अपघात टळले व मागील काही महिन्यांत सुरक्षित रेल्वे संचालन सुनिश्चित झाले. या उल्लेखनीय कार्याच्या मान्यतेस्वरूप हे संरक्षा पुरस्कार प्रदान करण्यात आले. प्रत्येक पुरस्कारामध्ये पदक, प्रशस्तीपत्र, उत्कृष्ट सुरक्षा कार्याचा उल्लेख असलेले प्रशस्तिपत्र आणि रु ३,५००/- रोख पारितोषिक यांचा समावेश आहे.

पुरस्कार प्राप्त कर्मचाऱ्यांमध्ये मुंबई विभाग श्री लक्ष्मण रघुनाथ जाखरे काँटेवाला आटगाव, श्री पंढरीनाथ सोमा नाडेकर ट्रेन व्यवस्थापक कल्याण, श्री रणजीत कुमार यादव हेल्पर (एस अँड टी) ठाणे नागपूर



विभागात श्री अनुराग श्रीवास्तव सहाय्यक काँटेवाला तडाली, श्री प्रदीप निर्मळ, हेल्पर (एस अँड टी) आमला, श्री उमेश मौर्य, लोको पायलट (शंटर) घुग्घुस,भुसावळ विभागात श्री फुल कुमार गौतम, लोको पायलट (गुड्स),श्री राहुल चंदा, एमएसएम (कॅरेज अँड वॅगन), श्री विजय सुरडकर, कॉन्स्टेबल (आरपीएफ) जळगाव, सोलापूर विभागात श्री उमेश रमेश बदर, कनिष्ठ अभियंता (टीआरडी) कुर्डुवाडी, श्री भानुदास एन. शेळके, ट्रॅक मेंटेनर अरग, पुणे विभागात श्री कंचन कुमार, वरिष्ठ विभाग अभियंता (पी.वे) सांगली यांचा समावेश आहे.मध्य रेल्वे महाव्यवस्थापक श्री प्रतीक गोस्वामी, यांनी सर्व पुरस्कार प्राप्त कर्मचाऱ्यांचे कर्तव्यनिष्ठा आणि सतर्कतेबद्दल अभिनंदन केले तसेच त्यांच्या कृतीमुळे इतर रेल्वे कर्मचाऱ्यांनाही सतर्क राहून प्रवाशांची सुरक्षितता व रेल्वे मालमत्तेचे संरक्षा सुनिश्चित करण्यासाठी प्रेरणा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला.

या वेळी प्रधान मुख्य संरक्षा अधिकारी चंद्रकिशोर प्रसाद, तसेच इतर प्रधान विभाग प्रमुख आणि मध्य रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# नेदरलँड्सने पाकिस्तानला झुंजवले

## वर्ल्डकपच्या पहिल्याच सामन्यात थोडक्यात अपसेट टळला



**कोलंबो : वृत्तसंस्था**

टी-२० विश्वचषक स्पर्धेला सुरुवात झाली असून पाकिस्तान आणि नेदरलँड्स यांच्यात पहिलाच अटीतटीचा सामना खेळवला गेला. नेदरलँड्स संघ अपसेट करण्याच्या जवळ पोहचला होता, पण फहीम अश्रफने पाकिस्तानला विजय मिळवून दिला.

१९व्या षटकात पाकिस्तानला विजयासाठी १२ चेंडूत २९ धावांची गरज होती. फहीम अश्रफ स्ट्राईकवर होता. त्याने पहिल्याच चेंडूवर षटकार खेचला. त्यानंतर दुसऱ्या चेंडूवरही तो मोठा फटका खेळायला गेला आणि कॅच ड्रॉप झाल्याने तो वाचला. यानंतर त्याने तिसऱ्या चेंडूवर षटकार लगावला. त्यानंतर पाचव्या चेंडूवर षटकार व सहाव्या चेंडूवर चौकार लगावत फहीमने २४ धावा कुटल्या. इथेच सामना पाकिस्तानच्या बाजूने फिरला.

नेदरलँड्सने दिलेल्या १४८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना पाकिस्तानच्या सयम अयुब व साहिबजादा फरहान या जोडीने चांगली सुरुवात केली, पण अयुब २४ धावा करत झेलबाद झाला. फिरकीपटू आर्यन दत्तने संघाला दोन विकेट्स मिळवून दिल्या, तर त्यानंतर साहिबजादा फरहान व सलमान अली आघा यांनी शानदार फटकेबाजी केली. सलमान १२ धावांवर झेलबाद झाला. यानंतर फरहान ४७ धावा करत माघारी परतला.

बाबर आझमने संघाला पुन्हा निराश केले. तो १८ चेंडूत एका चौकारासह १५ धावा करीत बाद झाला. इथूनही नेट रन रेटचा दबाव वाढत गेला. पहिले तीन फलंदाज वगळता पुढचे कोणतेही फलंदाज मोठी धावसंख्या उभारू शकले नाहीत. फहीम अश्रफने १९व्या षटकात लोगान बीकच्या गोलंदाजीवर एक षटकार मारला आणि पुढच्या चेंडूवर कॅच ड्रॉप झाल्याने त्याला जीवदान मिळाले. यानंतर फहीमने पाकिस्तानला विजय मिळवून दिला.

नेदरलँड्सच्या गोलंदाजांनी उत्कृष्ट गोलंदाजी करत पाकिस्तानच्या धावांवर अंकुश ठेवला. नेदरलँड्सकडून आर्यन दत्त व व्हॅन मीकरन यांनी प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या, तर व्हॅन बीक, क्लाईन, व्हॅन डेर मीर्वे यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला.

तत्पूर्वी पाकिस्तानने पहिल्या वर्ल्डकप सामन्याची नाणेफेक जिंकत नेदरलँड्सला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केले होते. नेदरलँड्स संघ १४७ धावांवर सर्वबाद झाला. स्कॉट एडवर्ड्सने २९ चेंडूत तीन चौकार व एका षटकारासह ३७ धावांची सर्वात मोठी खेळी केली.

# बीसीसीआयच्या केंद्रीय करारात मोठे बदल

## ए प्लस कॅटेगिरी रद्द; रोहित, विराट आता बी श्रेणीत



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

बीसीसीआयने २०२५-२६चे सेंट्रल कॉन्ट्रॅक्ट जाहीर केले आहे. यामध्ये टीम इंडियाचे दिग्गज फलंदाज विराट कोहली आणि रोहित शर्मा यांचे कॉन्ट्रॅक्टमध्ये डिमोशन झाले आहे. आतापर्यंत दोघेही ए+ कॅटेगरीत होते, मात्र टी-२० आणि कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यानंतर बीसीसीआयने त्यांना थेट बी कॅटेगरीत टाकले आहे. इतकेच नाही, तर यंदा बीसीसीआयने ए+ ही कॅटेगरीच रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे.

बीसीसीआयच्या म्हणण्यानुसार ए+ कॅटेगरी ही तिन्ही फॉरमॅट (टेस्ट, वनडे, टी-२०) नियमित खेळणाऱ्या खेळाडूंना दिली जात होती, पण सध्याच्या व्यस्त क्रिकेट वेळापत्रकात कोणीही सातत्याने तिन्ही प्रकार खेळत नसल्यामुळे ही कॅटेगरी काढून टाकण्यात आली आहे. आता खेळाडूंना फक्त ए, बी आणि सी अशा तीन गटांत विभागण्यात आले आहे.

यंदाच्या करारात टॉप ए कॅटेगरीत फक्त तीन खेळाडू आहेत. यामध्ये शुबमन गिल, जसप्रीत बुमराह आणि रवींद्र जडेजा यांचा समावेश आहे. जडेजाने टी-२० क्रिकेटमधून निवृत्ती घेतली असली, तरी टेस्ट आणि वनडेतील कामगिरीमुळे त्याला टॉप कॅटेगरीत स्थान देण्यात आले आहे.

विराट कोहली आणि रोहित शर्मा यांच्यासोबत सूर्यकुमार यादवलाही बी कॅटेगरीत ठेवण्यात आले आहे. याच कॅटेगरीत ऋषभ पंत, केएल राहुल, हार्दिक पंड्या, वॉशिंग्टन सुंदर, मोहम्मद सिराज, कुलदीप यादव, यशस्वी जैस्वाल आणि श्रेयस अय्यर यांचा समावेश आहे. एकूण ११ खेळाडू या कॅटेगरीत आहेत.

सी कॅटेगरीत अनेक युवा खेळाडू आहेत. त्यात अक्षर पटेल, शिवम दुबे, वरुण चक्रवर्ती, अभिषेक शर्मा, रिंकू सिंग, टिळक वर्मा, अर्शदीप सिंग, संजू सॅमसन, प्रसिद्ध कृष्णा, ऋतुराज गायकवाड यांच्यासह एकूण १६ खेळाडूंचा समावेश आहे.

या बदलांमधून बीसीसीआयने संकेत दिला आहे की आता केवळ नाव किंवा जुन्या कामगिरीच्या आधारावर नव्हे, तर सध्याचा संघामधील सहभाग आणि फॉरमॅटमधील सक्रियता पाहून खेळाडूंना मानांकन दिले जाईल. विराट कोहली आणि रोहित शर्मा यांचे क्रिकेटमधील योगदान अमूल्य असले तरी नव्या धोरणात त्यांचे स्थान खाली आले आहे.

# पंतप्रधान नरेंद्र मोदींकडून भारतीय युवा क्रिकेट संघाचे कौतुक

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयुष म्हात्रेच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने झिम्बाब्वेच्या हरारेच्या मैदानात रंगलेल्या फायनलमध्ये इंग्लंडला हरवून सहाव्यांदा आयसीसी अंडर-१९ वर्ल्डकपवर आपले नाव कोरले. दहाव्या प्रयत्नात सहावी ट्रॉफी जिंकणाऱ्या युवा टीम इंडियाने यंदाच्या हंगामात एकही सामना न गमावता ट्रॉफी उंचावली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी खास सोशल मीडिया पोस्ट करत युवा खेळाडूंचे अभिनंद करत त्यांना भविष्यातील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या अधिकृत एक्स अकाउंटवरून टीम इंडियाला शुभेच्छा देणारे ट्वीट केले आहे. यात त्यांनी भारतीय संघाच्या ऐतिहासिक कामगिरीचा उल्लेख हा भारतीय क्रिकेटमधील प्रतिभावंत खेळाडूंची चमक दिसली अशा शब्दांत केला आहे. त्यांनी पुढे लिहिले की, भारतीय अंडर-१९ संघाने वर्ल्डकप जिंकून देशाचे नाव उंचावले याचा आम्हाला प्रचंड अभिमान आहे. संपूर्ण स्पर्धेत संघाने उत्कृष्ट कामगिरीसह अविश्वसनीय कौशल्य दाखवून दिले. हा विजय अनेक तरुण खेळाडूंना प्रेरणा देणारा ठरेल. पुढील वाटचालीसाठी सर्व खेळाडूंना मनःपूर्वक शुभेच्छा!

सोशल मीडियाच्या माध्यमातून राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनीदेखील भारतीय संघाच्या विक्रमी सहाव्या वर्ल्डकप विजेतेपदाबद्दल संघाचे अभिनंदन केले आहे. संपूर्ण स्पर्धेत संघ अपराजित राहिला, याचा खास उल्लेख करत त्यांनी भारतीय संघाची कामगिरी देशासाठी अभिमानास्पद क्षण असल्याचे सांगत खेळाडूंना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# रोहित शर्मा, हरमनप्रीत कौर यांचा वारसा जपल्याचा आनंद -आयुष म्हात्रे

**मुंबई : प्रतिनिधी**



झिम्बाब्वे येथील हरारेच्या मैदानात रंगलेल्या फायनलमध्ये इंग्लंडला १०० धावांनी पराभूत करत भारताच्या अंडर-१९ संघाचा कर्णधार आयुष म्हात्रे याने अंडर १९ भारतीय संघाला सहावे जेतेपद मिळवून दिले. या ऐतिहासिक कामगिरीनंतर आयुषने भारतीय संघाचा माजी कर्णधार हिटमॅन रोहित शर्मा आणि भारतीय महिला संघाला जगज्जेता करणाऱ्या हरमनप्रीत कौरचा वारसा जपल्याचा आनंद असल्याची गोष्ट बोलून दाखवली.

भारताच्या या सुवर्णयुगाची सुरुवात २०२४मध्ये रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली टी-२० वर्ल्डकप जिंकून झाली. त्यानंतर २०२५मध्ये निकी प्रसादच्या नेतृत्वाखाली भारताच्या अंडर-१९ महिला संघाने टी-२० वर्ल्डकप पटकावला. याच वर्षी हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखाली भारतीय वरिष्ठ महिला संघाने मायदेशात वर्ल्डकप जिंकून इतिहास रचला होता. आता आगामी टी-२० वर्ल्डकप स्पर्धेआधी आयुष म्हात्रेने भारतासाठी आणखी एक वर्ल्डकप जिंकून देत क्रिकेट जगतात भारताचा दबदबा असल्याचे सिद्ध केले आहे.

इंग्लंडविरुद्धच्या फायनलमधील ऐतिहासिक कामगिरीनंतर आयुष म्हात्रे म्हणाला की, माझ्या भावना शब्दांत व्यक्त करणे कठीण आहे. हा क्षण आमच्यासाठी अविस्मरणीय आहे. संपूर्ण स्पर्धेत संघाने अप्रतिम खेळ केला. जे ठरवले होते ते अगदी अचूकपणे साध्य करून दाखवले. रोहित शर्मा आणि हरमनप्रीत कौर यांचा वर्ल्ड कप स्पर्धेतील जेतेपदाचा वारसा जपण्यात यशस्वी ठरलो, याचा आम्हाला अभिमान वाटतो.

### वैभव सूर्यवंशीचे तोंडभरून कौतुक

वैभव सूर्यवंशीच्या वादळी खेळीसंदर्भात आयुष म्हात्रे म्हणाला की, तो (सूर्यवंशी) थांबतच नव्हता. त्याच्या खेळी निःशब्द करणारी आहे. तो किती उत्कृष्ट फलंदाज आहे, हे त्याने आज दाखवून दिले. हीच वृत्ती आपण कायम ठेवली पाहिजे. कदाचित भविष्यात आम्ही सगळे एकाच संघात खेळणार नाही, पण ही मानसिकता पुढे घेऊन जाणे महत्त्वाचे आहे.

# वडिलांच्या शब्दांनी दिले बळ अन् लेकाने ठोकली कडक सेंच्युरी!

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय अंडर १९ संघाने झिम्बाब्वेच्या हरारेच्या मैदानात इंग्लंडला १०० धावांनी पराभूत करत विक्रमी विजयासह सहाव्यांदा या स्पर्धेचे जेतेपद पटकावले. आयपीएलपासून प्रत्येक स्पर्धेत शतक ठोकणाऱ्या वैभव सूर्यवंशीच्या बॅटमधून फायनलपर्यंत एकही शतक आले नव्हते, पण इंग्लंडविरुद्धच्या जेतेपदाच्या लढतीत त्याने ऐतिहासिक खेळी साकारली. वाऱ्याच्या वेगाने शतक साजरे करून तो अगदी द्विशतकाच्या जवळ पोहचला होता. २५ धावांनी त्याचा द्विशतकी डाव फसला,



पण शेवटी त्याच्या धमाकेदार खेळीच्या जोरावरच टीम इंडियाला जेतेपदाचे समाधान मिळाले.

फायनलमध्ये धडक मारल्यावरही शतकाचा रकाना रिकामा असल्यामुळे वैभव सूर्यवंशी दुःखी होता. कुठेतरी कमी पडल्याची खंत मनात असताना त्याने 'बाप-माणसा'ला एक कॉल केला अन् या कॉलवर झालेल्या संवादातील 'त्या' शब्दांनी त्याला बळ मिळाले. १४ वर्षाच्या लेकाने शेवटी शतक ठोकले. युवा टीम इंडियाच्या ऐतिहासिक विजयानंतर खुद्द वैभव सूर्यवंशीच्या वडिलांनीच या संदर्भातील खास गोष्ट सांगितली आहे.

भारतीय संघाने ऐतिहासिक जेतेपद मिळवल्यावर स्टार स्पोर्ट्सला दिलेल्या मुलाखतीमध्ये वैभव सूर्यवंशीचे वडील संजीव सूर्यवंशी यांनी लेकाच्या मनात सलणाऱ्या गोष्टीवर भाष्य केले. ते म्हणाले की, सेमीफायनलनंतर वैभव स्वतःच्या कामगिरीवर निराश होता. आतापर्यंत प्रत्येक आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत शतक झळकावले, पण या स्पर्धेत मोठी खेळी करता आली नाही, असे त्याला वाटत होते.

पप्पा माझ्याकडून काही तरी चूक होत आहे, असे वैभवने बोलून दाखवले. यावर मी त्याला दिलासा दिला, तू चांगला खेळत आहेस. तुझ्या कामगिरीवर आम्ही समाधानी आहोत. बाकी सर्व देवावर सोड अन् तू तुझा स्वाभाविक खेळ खेळत राहा. हे ऐकून त्याला बरे वाटले आणि त्याच्या बॅटमधून मोठी खेळी आली, अशी स्टोरी वडिलांनी शेअर केली आहे.

## हेटमायरने पकडला अविश्वसनीय झेल

**कोलकाता : वृत्तसंस्था**

आयसीसी टी-२० वर्ल्डकप स्पर्धेत वेस्ट इंडिजचा पहिला सामना स्कॉटलंडविरूद्ध पार पडला. या सामन्यात शिमरोन हेटमायरने फलंदाजी करताना दमदार अर्धशतकी खेळी केली आणि वेस्ट इंडिजला मोठी धावसंख्या उभारून देण्यात मोलाची भूमिका बजावली. त्यानंतर क्षेत्ररक्षण करताना त्याने सीमारेषेवर अविश्वसनीय कॅच घेतला.

जॉर्ज मुंसेने मारलेला चेंडू सीमारेषेच्या दिशेने जात होता. त्या वेळी हेटमायरने डाईव्ह मारून एका हाताने झेल टिपला, ज्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.

# अंडर-१९ वर्ल्डकप विजेत्या भारतीय संघासाठी बीसीसीआयने जाहीर केले बक्षीस

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

बीसीसीआयने अंडर-१९ विश्वचषक जिंकणाऱ्या भारतीय संघासाठी ७.५ कोटी रुपयांच्या रोख बक्षिसाची घोषणा केली आहे. फायनलमध्ये भारताने इंग्लंडवर १०० धावांनी मात करत सहाव्यांदा हा किताब जिंकला आणि देशभरात आनंदाचे वातावरण पहायला मिळाले.

बीसीसीआयचे सचिव देवजित सैकिया यांनी सांगितले की, इंग्लंडला हरवून अंडर-१९ विश्वचषक जिंकल्यामुळे संपूर्ण देश आनंदात आहे. या ऐतिहासिक यशाबद्दल संघाला ७.५ कोटी रुपयांचे बक्षीस देण्याचा निर्णय घेतला आहे.

बीसीसीआयने प्रसिद्ध केलेल्या निवेदनात मुख्य प्रशिक्षक हृषिकेश कानिटकर आणि त्यांच्या सहकारी स्टाफचे विशेष कौतुक करण्यात आले आहे तसेच बोर्डाच्या सेंटर ऑफ एक्सलन्सचे क्रिकेट प्रमुख व्हीव्हीएस लक्ष्मणच्या मार्गदर्शनाचाही उल्लेख करण्यात आला आहे.



*सहाव्यांदा अंडर-१९ विश्वचषक जिंकणे ही अभिमानाची गोष्ट आहे. संपूर्ण स्पर्धेत संघाने आत्मविश्वास आणि जिद्द दाखवली. पुरुष आणि महिला दोन्ही अंडर-१९ विश्वचषक जिंकणे भारतासाठी मोठे यश आहे.*

**-मिथुन मनहास**, बीसीसीआयचे अध्यक्ष

# भारताला अंडर-१९ वर्ल्डकप जिंकून देणारे १५ हिरो

**मुंबई : प्रतिनिधी**

युवा भारतीय संघाने अंडर-१९ विश्वचषकाचे जेतेपद पटकावत इतिहास घडवला. या विजयासह टीम इंडियाने सहाव्यांदा अंडर-१९ विश्वचषकावर नाव कोरले. हा विश्वचषक जिंकून देणाऱ्या खेळाडूंवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

**आयुष म्हात्रे (कर्णधार)**

मुंबईचा युवा स्टार फलंदाज आयुष म्हात्रे याच्या नेतृत्वाखाली खेळताना भारतीय संघाने आयसीसी अंडर-१९ वर्ल्डकप स्पर्धेत जेतेपदाचा मान पटकावला आहे. आयुषने वयाच्या सहाव्या वर्षी क्रिकेट खेळायला सुरुवात केली.

**वैभव सूर्यवंशी**

वैभव सूर्यवंशी हे नाव म्हटले की षटकारांची आतिषबाजी आणि विक्रमी खेळी असे समीकरण दिसते. वयाच्या १४व्या वर्षी त्याने क्रिकेटमध्ये आपल्या नावाचा दबदबा तयार केला आहे. फायनल सामन्यात १७५ धावांची सर्वात मोठी खेळी करत भारताच्या विजयात मोलाचे योगदान दिले.

**विहान मल्होत्रा (उपकर्णधार)**

भारताच्या अंडर-१९ विश्वचषक संघाचा उपकर्णधार आहे. विहान मल्होत्रा हा उत्तम फलंदाज असून तो आपल्या फिरकीसाठीही ओळखला जातो. त्याला यंदाच्या आयपीएलमध्ये आरसीबी संघाने ३० लाख किमतीला लिलावात विकत घेतले आहे.

**आरोन जॉर्ज**

अंडर-१९ विश्वचषकाच्या सेमीफायनलमध्ये शतक करत भारताचा डाव आरोन जॉर्जने सावरला होता. तो हैदराबादकडून देशांतर्गत क्रिकेट खेळतो.

**आर अंबरीश**


अंडर-१९ वर्ल्डकप अंतिम सामन्यात मेडन षटकाने सुरुवात करत तीन विकेट्स घेत अंबरीशने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. अंबरीश हा वेगवान गोलंदाज असून तो खालच्या फळीत धावांचे उत्तम योगदान देतो.

**दीपेश देवेंद्रन**

दीपेशने अंडर-१९ विश्वचषक अंतिम सामन्यात एका षटकात दोन विकेट्स घेत इंग्लंडच्या मधल्या फळीला सुरूंग लावला. दीपेश हा एक वेगवान गोलंदाज असून तो १३५ किमी प्रति तास चेंडू टाकतो. तर काही वेळेस त्याने १४०चा आकडादेखील गाठला आहे.

**हेनिल पटेल**

अंडर-१९ विश्वचषकाच्या पहिल्याच सामन्यात पाच विकेट्स घेण्याचा पराक्रम करत हेनिल पटेलने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. वेगवान गोलंदाजी करणारा हेनिलदेखील जसप्रीत बुमराहप्रमाणे गुजरातचा आहे.



**अभिग्यान कुंडू**

नवी मुंबईतील चेतन जाधव यांच्या अकादमीत अभिग्यानने क्रिकेटची धुळाक्षरे गिरवली आहेत. अविनाश साळवी फाऊंडेशन आणि डी.वाय. पाटील स्पोर्टस् अकादमीत तो सराव करतो.

**वेदांत त्रिवेदी**

अंडर १९ वर्ल्डकप स्पर्धेत पाकिस्तानविरुद्ध भारतीय संघाची अवस्था ४७/३ अशी झाली होती. पारंपरिक प्रतिस्पर्ध्यांविरुद्ध वेदांतने ९८ चेंडूत ६८ धावांची अत्यंत संयमी खेळी साकारली.

**कनिष्क चौहान**

कनिष्क हा कुस्तीपटूंचे राज्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या हरियाणातील झझर गावचा. वडील शेतकरी आणि आई गृहिणी. क्रिकेटसाठी त्याने डेरा सच्चा सौदा इथे राहायचा निर्णय घेतला.

**हरवंश पंगालिया**

हरवंश पंगालिया आपल्या दमदार फलंदाजीसाठी ओळखला जातो. त्याच्यावर लहानपणापासून क्रिकेटचे संस्कार झाले.

**खिलान पटेल**

अंडर-१९ वर्ल्डकप फायनलमध्ये अखेरचा उत्कृष्ट झेल टिपत संघाचा विजय निश्चित करणारा खेळाडू ठरला खिलान पटेल. तो उत्तम फिरकीपटू आणि खालच्या फळीत धावा करणारा खेळाडू आहे.

**मोहम्मद इनान**

दुबईत जन्म झालेला मोहम्मद इनान याने केरळमधील अश्रेया क्रिकेट अकॅडमीत कोच दिनेश गोपाळकृष्ण यांच्या मार्गदर्शनाखाली क्रिकेटचे धडे गिरवले. मोहम्मद इनान हा फिरकीपटू असून तो फलंदाजीतही महत्त्वपूर्ण योगदान देतो.

**किशन सिंग**

पाकिस्तानविरुद्धच्या लढतीत किशन सिंगने प्रतिस्पर्धी संघातील हुझैफा अहसानच्या बुटांचे लेस बांधून दिले होते. किशनच्या या कृतीने चाहत्यांची मने जिंकली.

**उधव मोहन**

विराट कोहलीच्या दिल्लीस्थित अकादमीचा विद्यार्थी उधव मोहन वर्ल्डकप संघाचा भाग राहिला आहे.

# वैभव सूर्यवंशी परत खेळू शकणार नाही अंडर-१९ वर्ल्डकप

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय युवा संघाने १९ वर्षाखालील वनडे विश्वचषक स्पर्धेत अंतिम सामन्यात इंग्लंडचा १०० धावांनी पराभव करत सहाव्यांदा विजेतेपद पटकावले. १५ चौकार आणि १५ षटकारांच्या मदतीने ८० चेंडूत १७५ धावा ठोकणारा १४ वर्षीय वैभव सूर्यवंशी याला सामनावीर आणि स्पर्धेचा मालिकावीर असा दुहेरी सन्मान मिळाला. वैभव लहान असला तरीही तो आता पुन्हा या स्पर्धेत खेळताना दिसणार नाही. याला कारण बीसीसीआयचा एक नियम आहे.



बीसीसीआयच्या नियमानुसार कोणताही खेळाडू आपल्या कारकिर्दीत केवळ एकदाच १९ वर्षांखालील विश्वचषकात भारताचे प्रतिनिधित्व करू शकतो. जरी तो खेळाडू वयाच्या निकषात बसत असला आणि पुन्हा खेळण्यास पात्र असला तरी नवीन प्रतिभेला संधी देण्यासाठी आणि 'वयचोरीच्या' प्रकारांना आळा घालण्यासाठी बीसीसीआयने हा कडक नियम बनवला आहे.

आयसीसीच्या नियमानुसार वयाची अट पूर्ण करणारे खेळाडू एकापेक्षा जास्त वेळा हा विश्वचषक खेळू शकतात, मात्र भारतीय खेळाडूंना त्यांच्या देशाच्या क्रिकेट बोर्डांच्या विशेष नियमाचे पालन करणे अनिवार्य असते. त्यामुळेच वैभव आता परत अंडर-१९ विश्वचषक स्पर्धा खेळताना दिसणार नाही.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com